कृषीवल

रायगड ॥ मंगळवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२२

किंमत ४ ₹

माणगावकरांच्या तोंडचे पाणी पळाले

पान ३ वर

अनुभवी कुक पाहिजे

मँगो हट्स फार्म हाऊससाठी

पत्ता : मु. वाफेघर, रामेश्वर मंदिराजवळ पोस्ट, खवली, ता. सुधागड, रायगड ४१०२०५

आकर्षक पगार दिला जाईल.

संपर्क- राकेश कांबळे : ७३८५३९९७१२
ज्ञानेश्वर वानखेडे : ९९८७३७७०१३

आमदाराचं गाव, तरीही घागर उताणीच

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

'भरपूर निधी आहे, तुम्ही फक्त कामं सांगा', असे सांगून ग्रामस्थांची दिशाभूल करणाऱ्या बंडखोर आमदार महेंद्र दळवी यांना स्वतःच्या गावातील पाणीप्रश्न सोडविणे जमले नाही. त्यामुळे गेली कित्येक महिने हजारो अर्ज, तक्रारी देऊनही पाण्यासारखा गंभीर प्रश्न न सोडविणाऱ्या निष्क्रिय बंडखोर आमदाराविरोधात थळ प्रभाग क्रमांक ४ मधील ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. गेली अडीच वर्षे पाण्यासाठी वणवण करणाऱ्या महिलांनी अखेर सोमवारी (दि.१०) 'कृषीवल'समोर आपली व्यथा मांडली.

वय झालंय, डोक्यावर हंडा घ्यायला जमत नाही...

घरात एकट्या राहणाऱ्या, साठी उलटून गेलेल्या महिलांना डोक्यावर हंडा घ्यावा लागत आहे. पायपीट करताना रस्त्यात बसत-बसत घर गाठावे लागत आहे. वयोवृद्ध महिलांची केविलवाणी परिस्थिती पाहून उपस्थितांचे डोळेही पाणवले होते.

> थळ ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न अंदाचे पाच कोटी रुपये आहे. मात्र, तरीही थळ प्रभाग क्रमांक ४ मधील पाणीप्रश्न सोडविण्यास आमदार, सरपंच, उपसरपंच असमर्थ ठरत आहे. खोटी आश्वासने देऊन जनतेची फसवणूक करीत आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी केंद्र सरकार जलजीवन मिशन कार्यक्रम राबवित आहे. याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी ऑगस्ट महिन्यात विशेष ग्रामसभा घेण्याचे निर्देश दिले होते. मात्र, तरीही पाणीप्रश्न सुटलेला नाही. त्यामुळे पाण्यावरुन गावात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास ग्रामस्थ जबाबदार राहणार नाही.
>
> – शिरिष राजके, माजी ग्रामपंचायत सदस्य, थळ

यावेळी लक्ष्मी रामदास चंदू, जोमाय टिल्लू, विठाबाई ढोले, लता भाटे, वंदना कोळी, प्रमिला साखरकर, प्रमिला हालेकाना, सुचिता दिवाणे, राधा खोत, सुकन्या साखरकर आदी महिला उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे शेकापचे कार्यकर्ते शिरीष राजके यांच्यासह रामदास चंदू, कैलास टिल्लू, समाधान चंदू, शंतनू राजके, कृष्णा दिवाणे, गोरखनाथ दिवाणे, प्रमोद बामपाटील, सुशील दिवाणे, रुबीन साखरकर, शंकर चंदू आदी उपस्थित होते.

पाणी विकत घ्यावे लागतेय

नळाला पाणी येत नसल्याने या भागातील ग्रामस्थांकडून टँकर्सची मागणी वाढली आहे. दर दोन दिवस आड तब्बल ६०० रुपये खर्च करुन पाणी विकत घ्यावे लागते. एकवेळ आमच्याकडून पाणीपट्टी घ्या, तीदेखील आम्ही भरायला तयार आहोत. पण, आम्हाला आमच्या हक्काचे पाणी द्या, असा आक्रोश कोळी समाजाच्या महिलांनी केला आहे. पाणी देणार नसाल तर लावलेले रिकामे पाईप तरी कशाला हवेत? ते पण काढून न्या, असा संतापदेखील या महिलांनी व्यक्त केला.

थळ ग्रामपंचायतीच्या गलथान आणि मनमानी काराभाराचा फटका प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या नागरिकांना बसत आहे. उन्हाळा तीव्र झाला आहे. मात्र, नळाला नाही पाणी, घागर उताणी रे... अशी आळवणी नागरिकांना करावी लागत असल्याचे चित्र थळमधील काही भागात आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना करही भरावा लागतो. मात्र, पाणी वितरणात कमालीची अनियमितता दिसून येत आहे. जवळपास गेले सलग नऊ दिवस या भागात पाणीपुरवठा होत नाही. अशी परिस्थतीत महिन्यातून दोनवेळादेखील उद्भवते.

तक्रार केल्यानंतर दोन दिवस व्यवस्थित पाणी येते व नंतर पुन्हा येरे माझ्या मागल्या अशी स्थिती असते. तक्रारीचा काहीच लाभ होत नसल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले. •➤ पान २ वर

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे

शिवसेनेचे नवीन नामकरण

ठाकरे गटाला 'मशाल' चिन्ह

बाळासाहेबांची शिवसेना

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

शिवसेनेचे नाव तसेच धनुष्यबाण चिन्ह गोठविणाऱ्या केंद्रीय निवडणूक आयोगाने आता एकनाथ शिंदे गटाला 'बाळासाहेबांची शिवसेना' आणि ठाकरे यांच्या गटाला 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' या नावाला मंजुरी दिली आहे. ठाकरे यांच्या गटाला 'मशाल' हे नवे निवडणूक चिन्हही मंजूर करण्यात आले आहे. शिंदे गटाला मंगळवारपर्यंत चिन्हासाठी पर्याय देण्याचे निर्देश दिले आहेत.

सोमवारी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. ठाकरे यांच्याकडून मशाल, बाण आणि उगवता सूर्य ही तीन चिन्हे मंजुरीसाठी देण्यात आली होती. शिंदे गटानेही त्याच चिन्हांवर दावा केल्याने पेचप्रसंग निर्माण झाला. आयोगाने त्यातील 'उगवता सूर्य' आणि 'बाण' ही दोन्ही चिन्हे दोन्ही गटांसाठी बाद ठरविली आणि ठाकरे गटाला 'मशाल' हे निवडणूक चिन्ह देण्यात आले. अंधेरी पोटनिवडणुकीत शिवसेना आता 'मशाल' या चिन्हावर निवडणूक लढविणार आहे. ठाकरे गटाने नवीन नावासाठी तीन पिढ्यांची नावे वापरून निवडणूक आयोगाला तीन पर्याय दिले होते. 'शिवसेना बाळासाहेब ठाकरे', 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' आणि 'शिवसेना प्रबोधनकार ठाकरे' असे तीन पर्याय ठाकरे गटाने दिले होते. •➤ पान २ वर

उरण वायुविद्युत केंद्र दुर्घटना : दुसराही जखमी कर्मचारी दगावला

संतप्त ग्रामस्थांची कंपनी गेटवर धडक

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनी मर्यादित (वायु विद्युत केंद्र) उरण या प्रकल्पात रविवारी (दि. ९) घडलेल्या स्फोटाच्या दुर्घटनेत प्रकल्पातील बॉयलर प्रमुख प्रभारी विवेक धुमाळे यांचा जागीच मृत्यू झाला होता.

तर, प्रकल्पातील दुर्घटनेत गंभीररित्या जखमी झालेले कंत्राटी कामगार विष्णू यशवंत पाटील यांचा उपचारादरम्यान सोमवारी (दि १०) सकाळी मृत्यू झाला आहे.

ही दुर्घटना रविवारी सुट्टीच्या दिवशी घडली, नाहीतर मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली असती, असे कामगारांकडून सांगण्यात येत आहे. या दुर्घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी व मयत कामगारांच्या वारसांना कायमस्वरूपी नोकरी आणि ५० लाख रुपये भरपाई मिळावी यासाठी संतप्त ग्रामस्थांनी सोमवारी गेटवर धडक दिली.

वायु विद्युत केंद्रात झालेल्या स्फोटात बॉयलर प्रमुख प्रभारी विवेक धुमाळे, बॉयलर तंत्रज्ञ के.के. पाटील आणि कंत्राटी मदतनीस विष्णू यशवंत पाटील हे तिघेही दुर्दैवाने या आकस्मिक अपघातात उच्च दाबाच्या वाफेमुळे या अपघातात गंभीररित्या भाजले गेले. जखमींना तातडीने राष्ट्रीय बर्न सेंटर, ऐरोली •➤ पान २ वर

म ह त्त्वा चे

राऊत यांच्या कोठडीत पुन्हा वाढ

। मुंबई । प्रतिनिधी ।

पत्राचाळ गैरव्यवहारप्रकरणी शिवसेना नेते संजय राऊत यांच्या न्यायालयीन कोठडीत १७ ऑक्टोबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. राऊत यांनी जामीन मिळावा यासाठी ईडीच्या पीएमएलए न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्यावर २७ सप्टेंबरला सुनावणी पार पडली होती. मात्र, कोर्टाने संजय राऊत यांना दिलासा दिला नव्हता. कोर्टाने जामीन अर्जावरील सुनावणी १० ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा त्यांच्या न्यायालयीन कोठडीत सात दिवसांसाठी वाढ करण्यात आली आहे.

तीन अर्थतज्ज्ञांना नोबेल जाहीर

। स्टॉकहोम । वृत्तसंस्था ।

नोबेल समितीने सोमवारी अर्थशास्त्र क्षेत्रातील नोबेल पुरस्काराची घोषणाही केली. त्याअंतर्गत बेन एस बर्नान्के, डग्लस डब्ल्यू डायमंड आणि फिलिप एच डायबविग यांच्या नावांची घोषणा करण्यात आली. त्यांची या पुरस्कारासाठी संयुक्तपणे निवड करण्यात आली आहे. या तिघांना अर्थशास्त्र क्षेत्रातील बँकांवर संशोधन, आर्थिक संकट यासाठी जगातील सर्वात प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

गायीवर सुनावणीस सर्वोच्च नकार

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

गायीला राष्ट्रीय प्राणी जाहीर करण्याच्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. या याचिकेमध्ये गायींचं संरक्षण करण्याची मागणीही करण्यात आली होती. न्यायमूर्ती एस. एस. कौल आणि न्यायमूर्ती अभय ओक यांच्या खंडपीठासमोर याचिकाकर्त्यांना याचिका मागे घेण्याची परवानगी दिली आहे. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी भारत सरकारसाठी गायींची सुरक्षा हा फार महत्त्वाचा विषय असल्याचा युक्तीवाद केला.

नेताजी निवर्तले

मान्यवरांची आदरांजली

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि समाजवादी पार्टीचे (सपा) संस्थापक मुलायम सिंह यादव यांचं गुरुग्राममधील रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. गुरुग्राममधील मेदांता रुग्णालयामध्ये मागील काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरु होते. सपा परिवारात ते 'नेताजी' या नावाने ओळखले जात असत. त्यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह विविध राजकीय पक्षांच्या नेतेमंडळींनी आदरांजली वाहिली आहे. मुलायम यांचा जन्म २९ नोव्हेंबर १९३९ साली उत्तर प्रदेशमधील इटावा येथे झाला. त्यांनी अगदी तरुण वयापासून राजकारणात सक्रीय सहभाग घेतला होता. मुलायम सिंह यादव यांनी तीन वेळा उत्तर प्रदेश •➤ पान २ वर

बर्गर न मिळाल्याने बसवर दगडफेक

एक्स्प्रेसवरील घटना; सहाजण जखमी

। खोपोली । वार्ताहर ।

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर फुडमॉलमध्ये बर्गर न मिळाल्याने प्रवासी आणि हॉटेल मालक यांच्यात वादावादी झाली. त्याचे पर्यवसान बसवर दगडफेकीत होण्यात झाले. हा प्रकार रविवारी रात्री खालापूर टोलनाक्याच्या पुढे घडला. यामध्ये सहाजण जखमी झाले. आरोपींना रात्रीच ताब्यात घेण्यात आले आहे.

एकविरा भक्तगण परतीचा प्रवास करीत असताना फुडमाल हॉटेलमध्ये थांबले होते. यावेळी प्रवासीवर्गाने गोल्डन बर्गरची ऑर्डर केली. मात्र, या हॉटेलमध्ये बर्गर उपलब्ध नसल्याने प्रवाशांची हॉटेल मालकाबरोबर शाब्दिक बाचाबाच झाली. उपलब्ध नसणाऱ्या वस्तू मेन्यूकार्डमध्ये छापून फसवणूक का करता, असा सवाल उपस्थित करीत असताना येथील कर्मचारी व प्रवाशांमध्ये जोरदार चकमक झाल्याने वाद विकोपाला गेला. त्यामुळे येथील कर्मचारीवर्गाकडून बसवर दगडफेक करण्यात आल्याचे समोर आले.

सुरुवातीला दरोडा टाकण्याच्या उद्देशाने ही दगडफेक करण्यात आली असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. मात्र, वाहतूक पोलीस, खोपोली व खालापूर पोलीस तसेच द्रुतगती मार्गावरील आपत्कालीन •➤ पान २ वर

रक्तचंदन विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

तीन आरोपी ताब्यात; ४० किलो माल जप्त

। माणगाव । प्रतिनिधी ।

रक्तचंदन विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात माणगाव पोलिसांना यश आले आहे. थरारक पाठलाग करीत पोलिसांनी तिघांना अटक करुन त्यांच्याकडून ४० किलो रक्तचंदन जप्त केले आहे.

रायगडमध्ये रक्तचंदन विकण्यासाठी चोरटे येणार असल्याची खबर पोलिसांना लागली होती. त्यासाठी पोलिसांनी नकली ग्राहक बनून एक कोटी ३० लाख रुपयांचे व्यवहार ठरविला. मात्र, हे ग्राहक नसून पोलीस असल्याचे या रक्तचंदन विक्रेत्यांच्या लक्षात येताच त्यांनी आपल्या वॅगनर मारुती कार (एम.एच ०३ बीसी ३५९८) मधून पळ काढला. त्यावेळी माणगाव पोलिसांनी त्यांचा माणगाव ते इंदापूर असा दहा कि.मी. पाठलाग करीत इंदापूर येथील बाजारपेठेत नागरिकांच्या मदतीने कार अडविली आणि तीन आरोपींना शिताफीने पकडण्यात यश आले. त्यांच्याकडून ४० किलो रक्तचंदनसदृश्य माल ताब्यात घेतला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश अस्वर, पोलीस हवालदार पोळेकर, पोलीस कॉ. शाम शिंदे, शाम डोईफोडे, अमोल पोंदे, गोविंद तलवारे, दिपाली •➤ पान २ वर

जखमी होमगार्डला न्याय द्या; पित्याची आर्त हाक

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून प्रवाशाला मदत करत असताना भरधाव वेगात आलेल्या ट्रकने दिलेल्या ठोकरीत गंभीर जखमी होमगार्ड लक्ष्मण विठ्ठल आखाडे (३०) जगण्यासाठी संघर्ष करत असून, उपचारासाठी लागणाऱ्या भरमसाठ खर्चासाठी शासनाने मदत करावी, यासाठी लक्ष्मणचे वडील विठ्ठल आखाडे •➤ पान २ वर

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु

> मुलाच्या उपचाराकरिता लागणार सर्व खर्च शासनाने करावा. यापुढे शासकीय सेवेत रुजू करून घ्यावे तसे लेखी स्वरूपात पत्र द्यावे. संपूर्ण महाराष्ट्रातील होमागार्डना कॅशलेस योजना लागू कराव्या.
>
> – विठ्ठल आखाडे, अपघातग्रस्त लक्ष्मणचे वडील

उरणमध्ये तरुणावर खुनी हल्ला

। उरण । वार्ताहर ।

उरणमध्ये एका तरुणावर खुनी हल्ला करण्यात आला आहे. त्यामध्ये सदर तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याला पुढील उपचारासाठी नवी मुंबईत हलविण्यात आल्याचे समजते.

चारफाटा परिसरात रविवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास तरुणांमध्ये बोलाचालीचे रूपांतर हाणामारीत झाले. त्यामध्ये ताहा गुलजार शेख (२२) या तरुणाच्या गळ्यावर चाकूने वार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. गळ्यावर धारदार चाकूने वार केल्याने सदर तरुण रक्ताने पूर्णपणे माखलेल्या अवस्थेत उरणमधील दवाखान्यात दाखल झाला होता. परंतु, गंभीर जखमी असल्याने त्याला पुढील उपचारासाठी नवी मुंबईत हलविण्यात आल्याचे समजते.

या हल्ल्याप्रकरणी उरण पोलिसांनी रुपेश ललन प्रसाद (२२) रा. बेलपाडा आकसा, जासई, ता. पनवेल याला अटक केली असून, दुसरा साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाला. पुढील तपास उरण पोलीस करीत आहेत.

सरखेल कान्होजींचा 'समुद्री चाचे' असा उल्लेख

गुगल विकीपिडियावर शिवभक्त संतापले

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

गुगल आणि विकिपीडियावर सरखेल कान्होजी राजे आंग्रे यांचा 'समुद्री चाचे' असा उल्लेख केल्याने शिवभक्त संतापले आहेत. याबाबत आक्षेप नोंदवल्यानंतर विकिपीडियावर दुरुस्ती करण्यात आली आहे. मात्र, गुगलवर अजूनही असाच उल्लेख येत असल्याने याविरोधात आक्षेप नोंदविण्यासाठी इतिहासप्रेमींच्या वतीने मोहीम राबविली जात आहे.

गुगलवर 'कान्होजी आंग्रे' हा शब्द सर्च केल्यानंतर तिथे कान्होजी आंग्रे यांचा उल्लेख 'पायरेट्स' अर्थात 'समुद्री चाचे' असा करण्यात आल्याचं रविवारी दिसून आलं.

आक्षेप असा नोंदवा

गुगलवर जायचं, कान्होजी आंग्रे सर्च करायचं- त्यानंतर ओपन झालेल्या पेजवर जिथे हे pirate लिहिलेलं दिसतंय, त्यापुढे उजव्या कोपऱ्यात ३ : उभे डॉट्स असतील. त्यावर क्लिक करुन incorrect असा फीडबॅक नोंदवा, असे आवाहन शिवभक्तांनी केले आहे.

यानंतर समाजमाध्यमांवर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या.

मराठा आरमाराचे प्रमुख म्हणून सरखेल कान्होजी राजे आंग्रे यांना ओळखले जाते. ब्रिटिश डच पोर्तुगीज यांची अनेक आक्रमण त्यांनी परतावून लावली. भारतीय नौदलाकडून त्यांना मेंटोर म्हणून बघितले जाते. अशा कान्होजी राजे आंग्रे यांचा उल्लेख गुगलवर समुद्रीचाचे असा केल्याने संताप व्यक्त केला जात आहे. शिवभक्तांनी आणि इतिहासप्रेमींनी यावर आक्षेप नोंदवला आहे.

> हिंदवी स्वराज्याच्या नौदलाचा प्रमुख सरखेल, अठरा किल्ले आणि सालाना दोन कोटी महसूल आलेल्या भूभागाचा कर्तुम अकर्तुम अधिपती. किमान अडीचशे गलबत, गुराब, मचवे, फ्रिगेटचे दल बाळगणारा सेनानायक. ज्याच्या शिक्क्याच्या दस्तकाशिवाय इंग्रज-पोर्तुगीज आदी पश्चिमी सत्तांचे एकही जहाज पश्चिम सागर भ्रमण करु शकत नव्हते, असा सागराधीपती. ज्याने एकहाती इंग्रज आणि पोर्तुगीज यांचा सागरी उन्माद उधळून लावत मराठा जरीपटक्याचा दरारा सागरावर प्रस्थापित केला, अशा वीराचे पायरट हे वर्णन समस्त भारतवासियांकरिता अपमानास्पद आहे. यावर आक्षेप नोंदवणे गरजेचं आहे.
>
> – रघुजीराजे आंग्रे, कान्होजी राजे आंग्रे यांचे वंशज

यसाका लिक्वीड औषधी

कारले, जांभूळ, कडुलिंब इत्यादि १२ वनौषधींचे सुयोग्य आयुर्वेदिक मिश्रण

यात आहे हळद आणि गुळवेल जे इम्युनिटी वाढवण्यास मदत करते

HELPLINE NO.: 022 24380 299

A quality product from Simandhar

- ग्लुकोज मेटॅबॉलिजममध्ये मदत होते,
- थकवा कमी करते • पचनक्रिया सुधारते
- प्रतिकार शक्ती वाढवते • रक्त शुध्द करते
- जखम बरी होण्यास मदत करते

For more information log on to our website: www.simandharherbal.com

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

११ ऑक्टोबर

१)श्रीम.प्रतिभा म्हात्रे
नवेदर-चेंढरे, अलिबाग
११-१०-१९५२

महत्त्वाचे

कोकण विभागीय लोकशाही दिनी

। नवी मुंबई। प्रतिनिधी।
कोंकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली. यावेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या ७ त्यापैकी चार अर्ज निकाली काढण्यात आले. तीन तक्रारी प्रलंबित आहेत.

उद्योग वाढीसाठी पायाभूत सुविधा

। मुंबई। प्रतिनिधी।
उद्योग वाढीसाठी राज्यात उत्तम पायाभूत सुविधा तयार झाल्या आहेत, आता केंद्र आणि राज्य शासनाने हातात हात घालून काम केल्यास खऱ्या अर्थाने भारताचा कायापालट होऊ शकतो. महाराष्ट्र हे देशातील सर्वात औद्योगिक, प्रगतीशील आणि वेगाने विकसित होणारे राज्य आहे. त्यामुळे सध्याच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र पुन्हा एकदा वैभवाचे शिखर गाठेलफ, असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी व्यक्त केला. आज मुंबई येथे चौथी एनआयसीडीसी गुंतवणूकदार गोलमेज परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

महाराष्ट्र औद्योगिक टाऊनशिप लिमिटेडने या परिषदेचे आयोजन केले आहे. नामवंत गुंतवणूकदारांव्यतिरिक्त, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, विविध देशांचे वाणिज्य दूत आणि महाराष्ट्र सरकारमधील वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. केंद्रीय मंत्री गोयल पुढे म्हणाले, पायाभूत सुविधांच्या निर्मितीचे महत्त्व जगाने ओळखले आहे. यामुळे उद्योग वाढीसह अर्थव्यवस्थेला चालना तर मिळतेच, त्याचबरोबर अनेक नव्या संधी निर्माण होतात. राज्यात मेट्रो, ट्रान्स हार्बर, कोस्टल रोड, समृद्धी महामार्ग यासारख्या पायाभूत सुविधांची निर्मिती होत आहे. लॉजिस्टीक्सचा खर्च कमी होण्यासाठी यामुळे मदत होणार आहे.

तंत्रज्ञानाचा वापर करुन उद्योजकांसाठी देशात अनेक सुविधा निर्माण केल्या गेल्या आहेत. एक खिडकी योजनेच्या माध्यमातून परवानगी देण्याची सेवा ही सध्या प्रायोगिक तत्वावर सुरु आहे. यात काही सुधारणा करण्यासाठी सूचना आमंत्रित असल्याचेही केंद्रीय मंत्री श्री. गोयल यांनी सांगितले.

सन २०४७ पर्यंत देशाची अर्थव्यवस्था ३० ट्रिलीयन डॉलर एवढी होईलफ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ङ्महिला उद्योजक, स्टार्टअप यांचा देशातील वाढत्या उद्योजकतेत महत्वाचा सहभाग आहे. जगाचे ग्रोथ इंजिन म्हणून आपला देश काम करत आहेफ, असेही केंद्रीय मंत्री श्री. गोयल म्हणाले.

आवास येथे रंगला पैठणीचा खेळ

। खारेपाट। वार्ताहर।
आवास येथील दिलखुश सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाने रौप्यमहोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.यामध्ये खेळ पैठणीचा या कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा उदंड प्रतिसाद लाभला. यावेळी सिनेअभिनेते पुष्कर श्रोत्री यांच्यासह मान्यवर सहभागी झालेले होते. सामाजिक कार्यकर्त्या अभिलाषा राणे यांच्या हस्ते विजेत्या महिलांना पैठणी देण्यात आली. हे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष सुधीर राऊळ,सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ अध्यक्ष संदेश वर्तक व पाठक आळी ग्रामस्थ यांनी मोठी मेहनत घेतली. आवास रपंच, उपसरपंच, सदस्य याचेही सहकार्य लाभले.या सर्वांचे संदेश वर्तक यांनी सर्वांचे स्वागत केल आहे.

सावरकर स्मारकातर्फे हलाल सक्तीविरोधी परिषद

। मुंबई । प्रतिनिधी।
स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या पुढाकाराने आणि हिंदू जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकातील सावरकर सभागृह येथे हलाल सक्ती विरोधी परिषदेचे आयोजन स्मारको अध्यक्ष रणजित सावरकर, माजी खासदार डॉ. विजय सोनकरशास्त्री, यशवंत किल्लेदार, बी.पी. सचिनवाला, विवेक घोलप, मोतीलाल जैन, डॉ. विजय जंगम, संतोष गुप्ता हे उपस्थित होते. त्यांचीही या परिषदेत समयोचित भाषणे झाली. मुंबईत १२,१३ नोव्हेंबर रोजी ब्लॉसम मीडियाफक्रडून ङ्महलाल शोफ आयोजित केला आहे. त्याला विरोध करण्यासाठी या हलाल सक्ती विरोधी परिषदेचे आयोजन केले गेले आहे.

वीज चोरांविरुद्ध गुन्हे दाखल

२४ लाखांच्या वीजचोरीचा पर्दाफाश

। कल्याण। प्रतिनिधी।
महावितरणच्या टिटवाळा उपविभागातील मांडा व गोवेली परिसरात वीज चोरांविरुद्ध धडक मोहीम निरंतर सुरू आहे. कारवाईनंतर वीजचोरीच्या देयकाचा मुदतीत भरणा न करणाऱ्या ३९ जणांविरूद्ध वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार मुरबाड पोलिस ठाण्यात नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपींकडील २४ लाख रुपयांच्या वीजचोरीचा पर्दाफाश करण्यात महावितरणच्या पथकाला यश आले.

जगदीश दशरथ देशमुख (रा. म्हारळ, वरप), किशोर चव्हाण, संतोष सखाराम, काजल गुप्ता, विकी भालेराव, राजेंद्र बटपागड, राज सिद्धार्थ गस्टे, भुषण जाधव, दीपक भालेराव, मनिषा सुर्यवंशी, महेंद्र सुर्यवंशी, नागेश पैई, प्रिया शिंदे, संतोष गायकवाड, बारकू शिंदे, राहूल जखिरे, प्रकाश दिनकर, अब्बास शेख, बलराम नवशा बकुळे, झाकीर कुरेशी, संगिता प्रभू नाथ, सईरा अब्दूल लतिफ, गीता जयस्वाल, यास्मिन रगवी, भगवानदास गुप्ता, मोहम्मद इकलेक, अल्लाउद्दीन शेख, फिरोज जुबेदुल्ला साबा, सरफराज शोकीया, इसामाउद्दीन खान, श्रीमुर्ती मोर्या, अनवर उन्निसा, सुनिल मदनलाल गुप्ता, मीना पाल, सागर शाहा, सरफराज अहमद शाहा, वैशाली उबाळी, आकाश गायकवाड, सुनिल कुवड (सर्व राहणार टिटवाळा, ता. कल्याण) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. या सर्वच आरोपींनी वीज मीटरला येणाऱ्या केबलला टॅपिंग करून व वीज मीटर टाळून परस्पर वीजचोरी केल्याचे आढळून आले आहे. उपविभागीय अभियंता गणेश पवार यांच्या नेतृत्वाखाली सहायक अभियंता निलेश महाजन आणि कनिष्ठ अभियंता धनंजय पाटील त्यांच्या पथकाने ही कारवाई केली. वीजचोरीच्या गुन्ह्यात जबर शिक्षा व दंडाची तरतूद असून कोणत्याही प्रकारे विजेचा अनधिकृत वापर करू नये, असे आवाहन महावितरणकडून करण्यात येत आहे.

खोपोली पालिका कर्मचाऱ्यांना वैद्यकीय भरपाई वीमा योजना

। खोपोली । वार्ताहर।
नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या प्रलंबित मागण्यांसाठी अनेकवेळा पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा भारतीय कामगार कर्मचारी महासंघाच्या वतीने केल्यानंतर मुख्याधिकारी तथा प्रशासक अनुपजी दुरे यांनी पुढाकाराने सानुग्रह अनुदान,शून्य ते दोन लाख आणी कर्मचाऱ्यांची २५ वर्षापर्यंतच्या मुलांना वैद्यकीय भरपाई विमा विषयावर चर्चा झाल्यामुळेच कर्मचाऱ्यासाठींची वैद्यकीय भरपाई विमा योजना अंतिम टप्प्यात आल्याची माहिती कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष दिलीप सोनावणे यांनी दिली आहे.

प्रशासना समवेंत संघटनेची बैठक

मुख्याधिकारी तसेच प्रशासक अनुप दुरे यांच्या आदेशानुसार उपमुख्याधिकारी गौतम भगळे यांच्या दालनात सोमवारी बैठक झाली.यावेळी कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष दिलीप सोनावणे आणि पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी एकूण तीन विषयांवर चर्चा झाली असून वैद्यकीय भरपाई विम्याचे अर्धी रक्कम कर्मचारी भरतील असे सर्वानू मते ठरवण्यात आले आहे.वैद्यकीय विमा कार्ड आल्या पासून सर्व सुविधा सुरु होतील. अंशदान रासिकरण योंजनेचे जे हप्ते भरायचे राहिले आहेत ते पण लवकरच भरले जातील.तर उशीर होण्याचे कारण विचार ले असता आपल्या १४ कर्मचाऱ्यांचे आधार कार्ड मोबाईल नंबर लिंक केलेले नाहीत. म्हणून ते पैसे लेट होत आहेत. तसेच आज मा मुख्याधिकारी साहेब अलिबाग वरून आल्यावर त्यांच्या बसरोबर सानुग्रह अनुदान किती ते ठरवून येत्या दोन दिवसात कामगार कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करावेत अशी विनंती करीत उपमुख्याधिकारी भगळे यांचे आभार व्यक्त केले.

बेलदार समाजाचे प्रश्न सोडविण्याची मागणी

। खारेपाट। वार्ताहर।
राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यातील भटक्या- विमुक्त बेलदार समाजाचे प्रश्न सोडून समाजाला न्याय मिळवून द्यावा असे मत भा.ज.प. भटक्या- विमुक्त आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक राजू साळूंके यांनी त्यांच्या निवासस्थानी प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत चोंढी येथे व्यक्त केले.

पुढे म्हणाले की गेली अनेक वर्षे बेलदार भटक्या - विमुक्त समाजोच प्रश्न प्रलंबित आहेत मात्र असून योग्य त्या प्रमाणात सुटले नाहीत मात्र विद्यमान सरकार बेलदार भटक्या- विमुक्त समाजाला न्याय मिळवून देईल असा विश्वास व्यक्त केला. उच्च शिक्षणासाठी शासनाने योग्य तो निधी दिली पाहिजे आणि बेलदार भटक्या समाजाच्या सदस्याची शासनाच्या विविध महामंडळावर नियुक्ती करण्यात यावी. तसेच ६० वर्षांवरील माता भगिनींना शासनाच्या विविध आर्थिक योजनांचा लाभ मिळावा. इतर राज्यांप्रमाणे भटक्या बेलदार समाजाला एस.टी. मध्ये आरक्षण मिळावा यासाठी शासनस्तरावरुन प्रयत्न व्हावेत. रायगड जिल्ह्यात तसेच संपूर्ण महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यात भटका बेलदार समाज पसरलेला आहे. त्यांची भटकंती थांबून त्यांना रोजगार उपलब्ध करुन द्यावे तसचे त्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यात यावेत. अशी समाजाकडून मागणी होत आहे.

गुळसुंदे ग्रामस्थांचा आज पाण्यासाठी मोर्चा

। आपटा। वार्ताहर।
पनवेल तालुक्यामधील गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासीं व इतर गावकऱ्यांची फसवणूक करून त्यांना पाताळगंगा नदीचे प्रदूषित पाणी पाजून जीवाशी खेळणाऱ्या पनवेल पं.स.चे अकार्यक्षम गटविकास अधिकारी व रा.जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग पनवेलचे उप अभियंता यांचेवर सेवा हमी कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी मंगळवारी (११ ऑक्टोबर) कोकण भवनावर मोर्चा काढण्यात येणार आहे. एम.आय.डी.सी.चे थकीत पाणी बिल न भरता ग्राम निधीचा गैरवापर करणाऱ्या तुराडे, वावेघर व गुळसुंदे ग्राम पंचायतीचे सरपंच व सदस्यांची पनवेल प्रांतांनी केलेल्या शिफारशीनुसार लोकप्रतिनिधी पदे रद्द करण्यात यावी, गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी वाड्यांवर राबविण्यात आलेल्या नळ जोडणी योजनेच्या कामांची चौकशी करण्यात यावी. आश्वासित केलेप्रमाणे एम आयडीसीकडून नवीन (वॉटर टॅपिंग) जोडणी घेऊन मंजूर जल जीवन मिशन योजना तात्काळ कार्यान्वित करून गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी व इतर ग्रामस्थांना शुद्ध व नियमित पाणी पुरवठा करण्यात यावा. ह्या मागण्यांसाठी ग्राम संवर्धन सामाजिक संस्था व ग्रामस्थ लाडविली यांच्यावतीने हा मोर्चा निघणार आहे.

पान १ वरून

आमदाराचं गाव, तरीही घागर उताणीच

थळ ग्रामपंचायत ही सर्वात मोठी ग्रामपंचायत समजली जाते. या ग्रामपंचायतीला सुमारे पाच कोटीचे उत्पन्न मिळते. ग्रामपंचायत हद्दीतील गावे, वाड्यांमधील नागरिकांना एमआयडीसीमार्फत पाणी पुरवठा करण्यात आला आहे. परंतू थळ बाजार येथील कोळीवाड्यापर्यंत पाणी पोहचत नाहीत. गेल्या अनेक वर्षापासून पाण्यासाठी येथील महिलांना रात्र-रात्र जागून वणवण करावी लागत आहे. घरापासून सुमारे एक ते दीड किलोमीटर अंतरापर्यंत पायपीट करावी लागत आहे.

पाण्याचा प्रश्न सोडविण्याबाबत अनेक वेळा स्थानिक आमदारांसह सरपंच यांच्याकडे वारंवार कोळीवाड्यातील ग्रामस्थ, महिलांकडून मागणी करण्यात आली. त्यावेळी पाणी पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन फक्त दिले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रत्यक्षात मात्र पाणी मिळत नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

स्वातंत्र्यदिनी बंडखोर आमदार महेंद्र दळवी यांनी ग्रामस्थांना पाणी देण्याचे पुन्हा एकदा आश्वासन दिले. मात्र नेहमीप्रमाणे तेही खोटे निघाले. वारंवार खोटे बोलणाऱ्या आमदारांनी ग्रामस्थांना पाणी देण्याऐवजी फक्त आणि फक्त तोंडाला पाने पुसण्याचेच काम केले आहे. त्यामुळे आमदारांविरोधात ग्रामस्थांमध्ये वाढती नाराजी व्यक्त होत आहे.

वाडया शिंपण्यासाठी, बैल धुण्यासाठी पाण्याची उधळपट्टी

गावात कुठल्याही निवडणूका आल्या की नळांना उच्च दाबाने पाणी येते. मात्र निवडणूका संपताच पुन्हा पाणी बंद होत असल्याची कैफियत महिलांनी मांडली. आमचा भाग सोडून इतर भागात वाडया शिंपण्यासाठी नळाचे पाणी २४ तास असते. जनावरे, गाड्या धुण्यासाठी देखील वारेमाप पाणी मिळते फक्त आम्हाला साधे पिण्याचे पाणी देखील देता येत नसल्यानेमहिलांनी संताप व्यक्त केला.

संतप्त ग्रामस्थांची कंपनी गेटवर धडक

येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले. जखमींपैकी विवेक धुमाळे यांचा रुग्णालयात नेत असतानाच मृत्यू झाला. उर्वरित दोघांवर सद्यास्थितीत वरिष्ठ डॉक्टरांमार्फत आय.सी.यु मध्ये तातडीने उपचार सुरू असताना कंत्राटी कामगार विष्णू यशवंत पाटील यांचा सोमवारी (दि१०) सकाळी उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तसेच कुंदन कमळावर पाटील या जखमी कामगारांवर उपचार सुरू असून त्यांचीही प्रकृती चिंताजनक आहे.तर डेस्क ऑपरेटर प्रदीप सिंग, यांना किरकोळ दुखापत झाली असल्याने त्यांना मात्र बेलापूरच्या अपोलो हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

या घटनेचे गांभीर्य ओळखून कामगार नेते भूषण पाटील,रायगड जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर,लक्ष्मण पाटील,संध्या ठाकूर, दर्शन घरत, सरपंच मानसी पाटील,शेखर पाटील, सुनील पाटील, महादेव घरत यांच्या सह भेंडखळ, बोकडवीरा,फुंडे, डोंगरी ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांनी विष्णू यशवंत पाटील या सह इतर मयत कामगारांच्या वारसांना कायमस्वरूपी नोकरी आणि ५० लाख रुपये भरपाई द्यावी.अशी मागणी प्रकल्पाच्या प्रवेशद्वाराजवळ केली आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन महानिर्मितीचे संचालक संजय मारुडकर व कार्य संचालक गिरीश कुमारवार यांनी इस्पितळात भेट दिली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली उरण वीज केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे पुढील कार्यवाही करत आहेत.

रक्तचंदन विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश !

मोरे, यांनी या आरोपींना इंदापूर येथे पकडले. यात सुनील प्रेमचंद पटवा ,शारीक खान आणि इम्रान शेख सर्व रा.मुंबई अशी त्याची नावे आहेत. याना माणगाव पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. माणगाव वनविभाग भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

बर्गर न मिळाल्याने बसवर दगडफेक

यंत्रणांनी अधिक तपास केल्यावर द्रुतगती मार्गावरील हॉटेल फूडमॉलमध्ये बसमधील पर्यटक प्रवासी व हॉटेल व्यवस्थापक यांच्यात टोकाची बाचाबाची झाल्याचे समोर आले आहे. घटनेची माहिती होताच पोलीस यंत्रणा घटनास्थळी पोहोचली व फूडमॉल व्यवस्थापक व यातील काही संशयित व्यक्तींना तपासासाठी ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच या घटनेत जखमींना उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. या संदर्भात पोलीस अधिक तपास करीत आहेत. यातील दोषींवर कडक कारवाई होईल असे उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुक्ला यांनी सांगितले.

जखमी होमगार्डला न्याय द्या;पित्याची आर्त हाक

यांनीसोमवार दि.१० ऑक्टोबरपासून रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुर केले आहे. ५ सप्टेंबरला खालापूर हद्दीत रात्री दिड वाजणेचे सुमारास वणवे गावानजीक कारचा टायर फुटला होता. कारचालकाला मदतीकरता आयआरबी कंपनी, डेल्टा फोर्स, पेट्रोलिंग पथक, खालापूर पोलीस ठाणेकडील दरोडा प्रतिबंधक पथकमधील पोलीस व होमगार्ड पोहचले होते. सर्व सुरक्षा उपाय योजना करून कार सुरक्षित जागी ऊभी करून टायर बदलण्याचे काम सुरू असताना पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या ट्रकच्या चालकाचे नियंत्रण सुटले. ट्रकने सहा जणांना धडक दिली होती. यामध्ये गंभीर जखमी लक्ष्मण आखाडेचे दोन्ही पाय निकामी झाले.

अपघात होऊन एक महिना उलटला तरी अद्याप शासनाने कुठलीही मदत केली नाही. त्यांचा एक पाय कापला असून दुसरा पायही पन्नास टक्के निकामी झाला आहे. दुसरा पाय वाचविण्यासाठी पंधरा लाखांचा खर्च डॉक्टरानी सांगितल्याने त्यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट आले आहे. आखाडे कुटुंबासाठी हा खर्च न पेलणारा आहे. मुलासाठी विठ्ठल आखाडे यांनी आज सोमवार, १० ऑक्टोबरपासून जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे उपोषण सुरु केले आहे.

विठ्ठल आखाडे यांच्या उपोषणाला रायगड जिल्हा हर हर चांग भले धनगर समाज संस्था, जय मल्हार सेवाभावी संघ, कल्याणकर सेवाभावी संस्था रोहा, ग्रामसंवर्धन संस्था बांधणवाडी आदी संघटनानी पाठिंबा दिला आहे. यावेळी शिंग्रोबा कमीटी खोपोली बोरघाटचे अध्यक्ष बबन शेडगे, छावणी गरमलचे सरपंच बाळासाहेब आखाडे, शिंग्रोबा कमीटीचे माजी अध्यक्ष दिपक आखाडे, डिक्सळ पालीचे युवा नेते भगवान कोकरे, विठ्ठल बोडेकर, नारायण हिरवे, बारकू हिरवे आणि तुकाराम आखाडे आदी उपस्थित होते.

शिवसेनेचे नवीन नामकरण

त्यापैकी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या नावाला आयोगाने पसंती दर्शविली.दरम्यान, आयोगाने शिवसेना आणि निवडणूक चिन्ह बाद ठरविले. त्या निर्णयाविरुद्ध शिवसेनेच्यावतीने दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.त्याची सुनावणी मंगळवारी होणार आहे. दरम्यान शिवसेनेचे नवं चिन्ह कदाचित क्रांती घडवून आणेल. यापूर्वी देशात ज्या पक्षांची चिन्ह गोठवण्यात आली, ते पक्ष पुढे जाऊन मोठे झाले. आम्हीदेखील तसेच मोठे होऊ. आमच्यात असलेलं शिवसेनेचं स्पिरीट (इच्छाशक्ती) अजूनही हाय आहे. धनुष्यबाण चिन्ह गोठवल्याने आम्हाला कोणातही फरक पडत नाही. आम्ही नव्या जोमाने काम करु. आम्ही पक्षाचे नवे चिन्ह आणि पक्षाचे नवीन नाव लोकांपर्यंत पोहोचवू असा विश्वास खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केला.

नेताजी निवर्तले

राज्याचे मुख्यमंत्री पद भूषवलं आहे. तसेच १९९६ ते १९९८ दरम्यान ते केंद्र सरकारमध्ये संरक्षणमंत्रीही होते. दरम्यान, मुलायमसिंह यादव यांनी उत्तर प्रदेशच्या आणि राष्ट्रीय राजकारणामध्ये स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. आणीबाणीच्या कालावधीमध्ये ते लोकशाहीसाठी लढणारे महत्त्वाच्या नेतृत्वांपैकी एक होते. अशी प्रतिक्रिया नरेंद्र मोदी, यानी व्यक्त केली तर समाजवादी नेते राम मनोहर लोहिया यांच्या राजकीय विचारांवर मुलायम सिंह यादव चालत होते. देशातील विरोधी पक्षाला एकत्र आणण्याची मुलायमसिंह यादव यांची इच्छा होती. मात्र, त्यापूर्वीच ते आपल्यातून गेले. त्यामुळे समाजवादी चळवळीच मोठं नुकसान झालं.असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

बोनससाठी आंदोलन

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।
बोनसच्या मागणीसाठी एफएनसीओ आणि एनएफपीई या संघटनेच्या वतीने पोस्ट ऑफिस कर्मचाऱ्याना बोनस मिळावा या मागणीसाठी सर्व कर्मचाऱ्यांनी अलिबाग येथील पोस्ट कार्यालयासमोर काळ्या फित लावून निदर्शन केली. जिल्ह्यातही विविध पोस्टातील कर्मचाऱ्यांनी निदर्शने केली.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E - TENDER NOTICE

MSETCL INVITES ONLINE bids (e-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

RFX	Description	Est. Cost
Tend- 40/22-23 **RFX 7000024779**	Supply of 33kV & 22kV PTs under EHV (O&M) Circle, Panvel.	Rs. 3.46 Lakhs
Tend-42/22-23 **RFX 7000024827**	Supply of various clamp & connectors at 400kV R.S. Nagothane S/stn. under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.	Rs. 8.23 Lakhs

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST. Submission of bids from 10.10.2022 to 17.10.2022 up to 23:59 hrs, Opening date:-18.10.2022 @ 11:00 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006220. **E-mail ID:** se7200@mahatransco.in

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER
EHV (O&M) CIRCLE, PANVEL

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि.
जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग
जाहीर फेर निविदा (मसुदा)

शासकीय आधारभूत किंमत धान खरेदी योजने अंतर्गत रायगड जिल्ह्यांत सन २०२१-२२ मध्ये खरेदी केलेल्या भाताची (धानाची) भरडाई करण्यासाठी लगतच्या व इतर जिल्ह्यातील इच्छुक मिलधारकांकडून सीलबंद लिफाफ्यामध्ये ऑफर्स मागविण्यांत येत आहेत. इच्छुक मिलधारकांनी फेडरेशन प्रस्तावित केलेल्या ऑफर्स फॉर्ममध्ये फक्त कच्चा तांदूळ तयार करण्याच्या ऑफर्स द्याव्यात. भरडाई करावयाच्या भाता संबंधिच्या अटी व शर्ती तसेच ऑफर्स फॉर्म व कोरे ऑफर्स फॉर्म संबंधीत जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालय यांचेकडे कार्यालयीन वेळेत खालील पत्त्यावर प्राप्त होतील. ऑफर भरण्याचा कालावधी/कार्यक्रम खालील प्रमाणे

अ) ऑफर्स विक्री कालावधी	दि.१०/१०/२०२२ ते दि.१२/१०/२०२२
ब) ऑफर्स भरण्याची अंतिम तारीख	दि.१२/१०/२०२२ दुपारी १२.०० वाजेपर्यंत
क) ऑफर उघडण्याची तारीख	दि.१२/१०/२०२२ रोजी दु.०२.००

जिल्हा पणन अधिकारी
रायगड-अलिबाग

पत्ता-
जिल्हा पणन अधिकारी कार्यालय
दुसरा मजला, श्रीमान सोसायटी,
ई विंग, श्रीबाग नं.२, ता.अलिबाग,
जि.रायगड
भ्रमणध्वनी क्र.९७६५१४४००७

माणगावकरांच्या तोंडचे पाणी पळाले

पाणीपट्टीत दुप्पट वाढ, नागरिकांमध्ये संताप

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव नगरपंचायतीत सत्ताधारी शिवसेनेने घरपट्टी व नळपाणीपट्टी दरात दुपटीने वाढ करण्याचा निर्णय घेऊन पाणीपट्टी दरात दुपटीने वाढ देखील केली. घरगुती नळकनेक्शन पाणीपट्टी १००० रुपयांवरून २००० रुपये करण्यात आली असून त्या प्रमाणे कर वसुली सुरु करण्यात आली आहे. पाणीपट्टी दुपटीने वाढविल्यान ग्रामस्थाच्या तोंडचे पाणी पळाले आहे. नगरपंचायत हद्दीतील ग्रामस्थ पुरते हवालदिल झाले असून याबाबत नाराजी व्यक्त करीत आहेत.

नगरपंचायतीची जून २०१५ मध्ये निर्मिती झाल्यावर ग्रामस्थांना चागल्या प्रकारच्या सोयी सुविधा मिळतील अशी अपेक्षा होती. परंतु तशा सोयी सुविधा मिळत नसल्याने माणगाव ग्रामपंचायत होती ती बरी होती म्हणण्याची वेळ माणगावकरांवर

आली आहे. माणगाव नगरपंचायतीत एकुण १७ वॉड असून यापैकी जुने माणगाव व नाणोरे गावाला अजूनही अशुद्ध पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र पाणीपट्टी इतरांबरोबरच समान घेतली जात आहे. जुने माणगाव येथील मस्जिद महोल्ला ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन गेल्या २५ वर्षांपूर्वी मोहोल्ला व कुंभारआळी ग्रामस्थांसाठी स्वतंत्र नळपाणीपुरवठा योजना तयार केली होती. या ग्रामस्थांनी ही पाणी योजना देखभालीसाठी त्या वेळी माणगाव ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत केली होती. म्हणजेच आज या योजनेची देखभाल नगरपंचायतीकडे आहे. नगरपंचायतीची निर्मिती होवून ७ वर्षाहून अधिक काळ लोटला असून अजूनही जुने माणगाव येथील ग्रामस्थांना थेट काळनदीतील दुषित पाणी प्यावे लागत आहे. या भागातील ग्रामस्थांना नगरपंचायत हळूहळू दूषित पाण्याच्या रूपाने विष पाजत असल्याचा आरोप या भागातील सुज्ञ नागरिकांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना व्यक्त केला आहे. परंतु या ग्रामस्थांकडून पाणीपट्टी इतरांप्रमाणेच वसूल केली जात आहे. माणगावात अनेक वॉर्डातून फिल्टरयुक्त शुद्ध पाणीपुरवठा केला जात आहे. त्यांनाही तेवढीच पाणीपट्टी व ज्या भागात अशुद्ध पाणीपुरवठा केला जातोय त्यांनाही तेवढीच पाणीपट्टी हा कुठला न्याय ? असा प्रश्न जुने माणगावकरांना सतावतो आहे. या प्रश्नाबाबत वारंवार येथील ग्रामस्थांनी नगरपंचायतीचा लक्ष वेधूनही त्याकडे नगरपंचायत जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे असा आरोपही होत आहे.

पाणीपट्टी दरवाढ मागे घ्या -हर्षदा काळे

माणगाव नगरपंचायतीमध्ये नळ पाणीपट्टीत राष्ट्रवादी-शेकाप नगरसेवकांची दिशाभूल करून करण्यात आलेली दरवाढ मागे घेण्यात यावी अशी मागणी नगरपंचायतीच्या नगर सेविका हर्षदा काळे - सोंडकर यांनी आपले सर्व नगरसेवक नगरसेविका यांच्या वतीने नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार व मुख्याधिकारी संतोष माळी यांच्याकडे केली आहे. मासिक सभा नगर पंचायत कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सभेत राष्ट्रवादी कॉंग्रेस व शेकाप नगरसेवकांच्या वतीने नगरसेविका हर्षदा काळे-सोंडकर यांनी पाणीपट्टी दरवाढी बाबत नगरसेवकांची दिशाभूल करण्यात आली असल्याचे नमूद केले आहे.

> नगरपंचायतीचा पाण्याचा उत्पन्न ४५ लाख रुपये होतो.तर खर्च जवळपास सव्वा कोटी रुपये होतो. त्यामुळे ही दरवाढ करण्यात आली आहे.
>
> – राजेश मेहता, पाणीपुरवठा सभापती

> दुपटीने पाणीपट्टी वाढवीली हे चुकीचे आहे. गेली दोन वर्ष कोरोना व निसर्ग चक्रिवादळाच्या संकटात गेल्याने २०० ते ३०० रुपये वाढ केली असती तरी चालले असते.सर्व सामान्य जनतेचा विचार करायला हवा.ज्यांची थकबाकी आहे ती वसुल केली तरी हा प्रश्न सुटेल. –ममता थोरे, शेकापच्या नगरसेविका

आगरदांडा-दिघी मार्गावर होणारी
प्रवाशांची लूट अखेर थांबली

। मुरूड । वार्ताहर ।

आगरदांडा -दिघी या एकाच जलमार्गावर मार्गावर चालणाऱ्या दोन फेरी बोटींच्या तिकीट दरात असणाऱ्या प्रचंड तफावतीमुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. सुवर्ण दुर्ग शिपींग कारपोरेशन ची फेरी बोट ५० रु जादा आकारुन प्रवाशांची लुट करत होती. गेले दीड वर्ष चाललेल्या या लुटीकडे मेरीटाईम बोर्ड दुर्लक्ष करत होती. कृषीवलमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या प्रभावामुळे रविवार ९ ऑक्टोबरपासून दोन्ही फेरी बोटीचे दर समान झाल्याने संभ्रम दूर होऊन प्रवाशांची होणारी लूट अखेर थांबली आहे. त्यामुळे प्रवाशांमधुन समाधान व्यक्त होत आहे.

कृषीवल इफेक्ट

सन २०२२ डिसेंबरपासून फक्त तीन महिन्यांसाठी तिकीट दरवाढ करण्याची परवानगी सूवर्ण दुर्ग शिपींग कार्पोरेशनला मेरीटाईम बोर्डाने दिली होती. दिघी सागरी जलवाहतूक सोसायटीला तिकीट दरवाढ करण्याची परवानगी मात्र मिळाली नाही. त्यामुळे या एकाच जलमार्गावर चालणाऱ्या या दोन फेरी बोटींच्या तिकीट दरात प्रचंड तफावतीमुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. वाढीव दर घेणाऱ्या सुवर्ण दुर्ग शिपींग कारपोरेशनला फक्त तिन महिन्यांसाठी तिकीट दरवाढ करण्याची परवानगी होती ती संपली तरी गेले जीड वर्ष तिकीट दर कमी न करता बिंधास्त प्रवाशांची लुट सुरू होती.

अखेरीस प्रवाशांनी निदर्शनास ही बाब आणून दिली. या लुटी संदर्भातील वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर मेरीटाईम बोर्डाने दखल घेतली व वाढीव दर कमी केले दोन्ही फेरी बोटीचे दर समान झाल्याने प्रवाशांमधील संभ्रम दूर होत होणारी पर्यटकांची लूट अखेर थांबली आहे.

म ह त्त्वा चे

शाळेला १० हजारांची मदत

। पनवेल । वार्ताहर ।

वीरशैव कक्कय्या (ढोर) समाज मंडळ, कामोठे आयोजित भव्य वधू-वर पालक स्नेहवर्धक परिचय मेळाव्यास (२०२२) महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस सचिव व ह. भ. प. दामाजी गणपत गोवारी शाळेचे संस्थापक/अध्यक्ष सुरदास (दादा) गोवारी यांनी १०,०००/- रूपये देणगी दिली. वीरशैव कक्कय्या (ढोर) समाज मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सुरदास (दादा) गोवारी यांचे आभार मानले. यावेळी पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष अजिनाथ सावंत, संस्थेचे अध्यक्ष मल्हारी सदाफुले, सचिव चंद्रकांत पोळ, उपाध्यक्ष रमेश सोनवणे व कार्यकारिणी सदस्य श्रीकांत शिंदे, विलास खरटमोल उपस्थित होते.

शिवाजी महाराज चौकाची स्वच्छता

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक राजू सोनी यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकाची स्वच्छता करून दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात अस्वच्छता व कचरा साठला होता याबाबत शिवप्रेमींनी त्यांच्यासमोर कैफियत मांडली होती.त्याची दखल घेत ही स्वच्छता करण्यात आली.

रिपाईंची येवला येथे जाहीर सभा

। पनवेल । वार्ताहर ।

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे हे १२ ऑक्टोबर पासून नाशीक जिल्ह्याच्या तीन दिवसअसून स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने येवला येथे जाहीर सभा आयोजीत केलेली आहे. भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला येथे धर्मांतराची घोषणा केली होती. त्या घटनेची आठवण म्हणून स्वाभिमानी रिपब्लीकन पक्षाने जाहीर सभेचे आयोजन केलेले आहे. या सभेला रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे उपस्थित राहणार आहेत.

सावरकरांच्या कवितांमधून उलगडला स्वातंत्र्यलढा

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

विनायक दामोदर सावरकर यांनी स्वातंत्र्याच्या लढ्यात त्यांच्या लेखनातून स्फुरण चढणाऱ्या तरूणांनी देश सेवेसाठी आपले बलिदान दिले आहे. यासाठी देशाला महासत्ता बनविण्यासाठीचे आदर्श असणाऱ्या सावरकरांच्या विचारातील मल्टिटास्किंग आजच्या पिढीने अंगिकारली पाहिजे असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक पार्थ बावस्कर यांनी केले

अलिबाग येथे संस्कारभारती तर्फे आयोजित हे मातृभूमी तुजला या कार्यक्रमात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कवितांचे निरूपण देताना पार्थ बावस्कर यांनी सावरकरांच्या कवितांमागील भावोत्कट कहाण्या सांगितल्या. त्यांना मुग्धा वैशंपायन, प्रणय पवार, प्रमोद दवे, केदार भगत आणि समीर कर्वे यांनी साथ दिली. यावेळी कार्यक्रमाला सरखेल कान्होजी राजे आंग्रे यांचे वंशज रघुजी आंग्रे, भैरवी आंग्रे, आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश पाटील , प्रदीप नाईक, अभिजित राणे, ॲड. सचिन जोशी , ॲड. जयंत चेऊलकर ॲड. श्रीराम ठोसर , डॉ. विशाखा मोडक , ॲड अमित चव्हाण , डॉ. उदय जोशी , हेमंत दांडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

वर्तमान आणि भविष्यकाळाचा वेध घेणारे त्यांचे लेखन आजच्या पिढीला प्रेरणा देणारे ठरत आहे. मात्रूभूमी बद्दल असणारे प्रेम त्यांच्या कवितांमधून प्रकट झाले आहे. म्हणूनच तर त्यांनी परदेशात शिक्षण घेताना स्वातंत्र्याच्या चळवळींना वेग देण्याचे काम केले. यंग इंडिया संस्था स्थापन करून तरुणांना स्वातंत्र्याच्या लढ्यात उतरवून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. असे पार्थ बावस्कर यांनी सांगितले.

आजच्या पिढीला उमगले पाहिजे

स्वातंत्र्याच्या भावनेने भारावलेल्या सावरकरांच्या मनात त्यांच्या आईने वाचनाचे संस्कार रुजवले. त्या वाचनाच्या वेडातून सावरकरांनी केलेल्या लिखाणातून सावरकर स्वातंत्र्यवीर होऊन अजरामर झाले. सावरकरांनी समुद्रात मारलेली उडी ऐतिहासिक झाली. त्यांच्या या देशसेवेच्या कामगिरीची बातमी जगभरातील १०९ वृत्तपत्रांनी दिली. त्यांच्या स्वातंत्र्याच्या मुद्द्याने फ्रान्समध्ये उलथापालथ झाली. केवळ आपल्या वैचारिक लेखनातून देशसेवेचे व्रत हाती घेणारे शब्दांच्या पलीकडले सावरकर आजच्या पिढीने वाचले पाहिजेत असे पार्थ बावस्कर यांनी सांगितले.

पेण तहसिलचा कारभार रिक्तपदांमुळे मंदावला

सर्वसामान्यांना होतोय त्रास

। पेण । प्रतिनिधी ।

तालुक्याचा कणा समजले जाणारे कार्यालय म्हणजे तहसिल कार्यालय परंतू आज तहसिल कार्यालय निम्म्याहून जास्तीचे पदे रिक्त आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांच्या कामात अनेक अडथळे येताना दिसतात.

पेण तहसिलमध्ये ३१ तलाठयांची आवश्यकता असताना १९ तलाठी उपलब्ध आहेत. तर १२ तलाठयांची जागा रिक्त आहे. तसेच मंडलअधिकारी ६ आवश्यक असताना फक्त २ मंडळ अधिकारी उपलब्ध आहेत. तर ४ मंडलअधिकाराऱ्यांच्या जागा रिक्त आहेत. या दोहोच्यामुळे शेतकऱ्यांची अनेक कामे रखडलेली पाहायला मिळतात. (वारस नोंदणी, सातबारा अपडेट, रेशन कार्डची कामे, उत्त्पनाचे दाखले अदी) तर तहसिल कार्यालयात एकूण १७ महसूल सहाय्यक (लिपीक) पद मंजूर असताना कार्यालयात ८ महसूल सहाय्यक उपलब्ध आहेत. तर ९ अरिक्त आहेत. तिच अवस्था नायब तहसिलदारांची ५ पैकी ३ नायब तहसिलदार उपलब्ध आहेत तर राजीव गांधी निराधार शाखेचा पद लॅब झाल्याने. ती जागा आकृती बंधातून काढून टाकली आहे. मात्र, निवडणूकीसारख्या महत्वाच्या शाखेला नायब तहसिलदार उपलब्ध नाही. तर ५ वर्षाचा कालावधी उलटून गेला तरी तलाठयांना सहाय्यक असणाऱ्या कोतवालांची भरतीच झालेली नाही. तालुक्याला ३१ कोतवालांची गरज असताना २२ कोतवाल उपलब्ध आहेत.

पेण तहसिल कार्यालयाकडून कार्यालयात कर्मचाऱ्यांची रिक्त असलेल्या पदाबाबत सप्टेंबर २०२२ ला वरिष्ठांकडे तहसिलदारांमार्फत लेखी कळविले आहे. मात्र, खुर्ची संघर्षाच्या वर्चस्वापुढे लोकप्रतिनिधींना कार्यालयांमध्ये रिक्त असलेल्या पदांबाबत काही घेणे देणे नाही. त्यामुळे आज अनेक कार्यालयांमध्ये कित्येक पद रिक्त असल्याने प्रत्येक कर्मचाऱ्यांना दोन-दोन, तीन-तीन कामाचे पदभार स्वीकारावे लागत आहेत. त्यामुळे त्याचा परिणाम कळत-नकळत कर्मचाऱ्यांचे कौटुंबिक जीवन धोक्यात येउन कामाच्या ताणावामुळे अधिकारी व कर्मचारी सेंटीमेंट झालेले पहायला मिळतात. तरी वरिष्ठांनी लवकरात लवकर या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन रिक्त पद लवकारात लवकर भरावी ही कर्मचाऱ्यांबरोबर जनतेची ही माफक अपेक्षा.

अवैध पार्किंगच्या विळख्यात पाली बाजारपेठ

। सुधागड -पाली । वार्ताहर ।

पाली शहरातील सर्वाधिक कळीचा मुद्दा कोणता असेल तर तो वाहतुकीचा व अवैध पार्किंगचा. पाली शहर हे हे अष्टविनायकांपैकी एक क्षेत्र, असे असले तरीही या शहरात गणपतीचे देवस्थान व्यतिरिक्त पार्किंगची व्यवस्थाच नसल्याने, ही बाब व्यवस्थेचे वाभाडे काढण्यासारखीच आहे.

हटाळेश्वर चौक, बाजारपेठ येथील वाहतुकीचा प्रश्न नेहमीच वादग्रस्त राहिला आहे. या परिसरात होणाऱ्या आवैध पार्किंगमुळे रस्त्याने चालणारे पादचारी तसेच दुकांनदार हे त्रस्त झाले असून .या अवैध पार्किंगमुळे दुकांनदारमध्ये भांडणही होत असतात. रस्त्यावर अवैध दुचाकी वाहने पार्किंगमुळे पाली शहरांमध्ये वाहतूक कोंडी होत आसते. वाहतुक कोंडी व अवैध पार्किंगमुळे पालीकर हैराण झाले आहेत. गांधी चौक ते बाजारतळे (हटाळेश्वर चौक) या रस्त्यावर सर्वात वाहतुकीची कोंडी होते. या रस्त्यांवर असंख्य टू-व्हीलर्स या रस्त्यावर उभ्या असल्याने नागरिकाना तर जीव मुठीत धरून मार्ग काढावा लागतो आहे.यावर कायमस्वरुपी उपाययोजना आवश्यक आहे.

रोहे तालुक्यात दसरा गडपूजन उत्साहात

। खांब-रोहे । वार्ताहर ।

शिवशंभू प्रतिष्ठान व गडदुर्ग प्रतिष्ठानचे वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी दसरा गडपूजनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

रोहे तालुक्यातील घेरासूरगड, अवचितगड, घोसाळगड व बिरवाडी गडावर दोन्ही प्रतिष्ठानच्या मावळ्यांनी गडावर साफसफाई मोहिम राबवून गडांचे प्रवेशद्वारावर तोरण बांधून. तसेच ऐतिहासिक वास्तूंचे पूजन करीत दसरा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. श्रीक्षेत्र वैजनाथ येथील दुर्गवीर प्रतिष्ठान मावळे किशोर सावरकर आणि महेंद्र पारठे यांनी क सुरगडाच्या पायथ्याशी असलेल्या अनसाई मातेची किशोर सावरकर आणि किशोरी सावरकर यांनी पूजा केली. सुरगडवर जाऊन सुरगडाच्या महादरवाजाला तोरणं बांधून गडपूजन केलं आधी तोरणं गडाला मग माझ्या दाराला या संकल्पनेचा ध्यास घेतला. गडावरील मारुती रायाची व महादेवाची पूजा करून आरती केली.या गडपूजन कार्यक्रमाचे वेळी मावळ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

अवकाळीने कांद्याच्या दरात तेजी

साठवणुकीचा माल खराब

। नवी मुंबई । प्रतिनिधी।

मुंबई कृषी उत्पन्न कांदा बटाटा बाजार समितीत गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे दर स्थिर होते ,परंतु सोमवारी घाऊक बाजारात कांदा वधारला आहे. प्रतिकिलो मागे दरात कमीत कमी ५रु ते जास्तीत जास्त ७ रुपयांनी वाढ झाली आहे. पावसामुळे साठवणुकीचे कांदे मोठ्या प्रमाणावर खराब झाले आहेत. तर नवीन कांद्याना ही पावसाचा फटका बसलेला आहे. त्यामुळे बाजारात उत्तम दर्जाचे कांदे कमी येत असल्याने ही दरवाढ होत असल्याचे मत व्यापाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

नवीन लाला कांदे अद्याप बाजारात दाखल होत नसल्याने

तसेच साठवणूकीचे कांदे खराब होत आहेत. त्यामुळे कांद्याच्या दराने उसळी घेतली आहे. मागील काही वर्षांपासून अवकाळी पावसाने जुन्या आणि नवीन कांद्याला झळ बसत आहे,परिणामी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये कांदा वधारत आहे. यावेळी ही मुसळधार पावसामुळे चाळीलीतील साठवणूकीचा जुना कांदा मोठ्या प्रमाणात सडलेला निघत आहे. सोमवारी बाजारात कांद्याच्या १४३ गाड्या दाखल झाल्या आहेत. त्यापैकी ८०% कांदा खराब निघत आहे, तर अवघे २०% कांदा चांगला येत आहे. बाजारात उच्चतम दर्जाच्या कांद्याला जास्त मागणी आहे. त्यामुळे दरात वाढ झाली आहे, अशी माहिती व्यापारी मनोहर तोतलानी यांनी दिली आहे. गेल्या तीन ते चार महिन्यांपासून प्रतिकिलो १५रु ते २०रुपयांवर स्थिर असलेल्या कांद्याच्या दरात आता ५ते ७ रुपयांनी दरवाढ झाली आहे. कांद्याची दरवाढ झाल्याने गृहिणींना मात्र आर्थिक झळ बसणार आहे.

दोन कुटुंबात हाणामारी

। कळंबोली । वार्ताहर ।

रस्त्यावरील शुल्लक कारणावरुन सुरु झालेला वाद मारामारीपर्यंत पोहोचल्याची घटना नवी मुंबईतील कळंबोळी वसाहतीत घडली आहे. या मारामारीत दोन्ही व्यक्तींच्या कुटुंबियांचा सहभाग होता.

कळंबोली वसाहतीमधील सेक्टर १६ मधील आशा नर्सिंग होम या रुग्णालयासमोर रविवारी सकाळी साडेअकरा वाजता अरुंद रस्त्यावर या भांडणाची सुरुवात झाली. दोन चारचाकी वाहने एकाचवेळी रस्त्यावरुन येजा करु शकत नसल्याने गाडी मागे घेण्यावरुन वाद सूरु झाला. रोडपाली गावातील रहिवाशी विक्रम ठाकूर हे फळे खरेदी करण्यासाठी बाजारात चारचाकी घेऊन आले होते. यावेळी सेक्टर १६ मधील साकेतधाम सोसायटीत राहणार २२ वर्षीय दिवेश पुजारी यांचीही चारचाकी गाडी याच रस्त्यावरुन जात होती. गाडी काढण्यावरुन वाद झाल्याने दिवेश याने विक्रम यांना मारहाण केली. त्यानंतर दिवेश घरी गाडी घेऊन निघून गेला. विक्रमने दिवेशच्या गाडीच्या नंबरप्लेटचा फोटो काढून या घटनेची माहिती गावातील त्याच्या कुटूंबियांना दिली. दवेश साकेतधाम सोसायटीत घरी गेला. विक्रम याचे ठाकूर कुटूंबिय तोपर्यंत साकेतधाम सोसायटीत पोहचले होते. काही मिनिटांत दिवेश याचे आईवडील आणि ठाकूर कुटूंबियांमध्ये हाणामारी झाली.

कोरोना केंद्रातील खाटा कचऱ्यात

कोट्यवधींच्या रुपयांची नासाडी

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

कोरोनाकाळात नवी मुंबई महापालिकेच्यावतीने रुग्णांच्या उपचारासाठी महापालिकेने स्वतःचे करोना उपचार केंद्र सुरू केले होते. या केंद्रांमध्ये रुग्णांना लागणाऱ्या खाटा महापालिकेने स्वतः खरेदी केल्या होत्या. कोरोनाकाळ सरल्यानंतर या खाटा महापालिका रुग्णालयांत वापरता येतील, हा तत्कालीन आयुक्त अभिजित बांगर यांचा उद्देश होता. मात्र आयुक्तांची बदली झाल्यानंतर या खाटा पालिकेच्या रुग्णालयात आरोग्य केंद्रात पोहोचण्याऐवजी थेट कचऱ्यात पोहोचल्या आहेत. उपचार केंद्र बंद झाल्यानंतर वापरल्या गेलेल्या शेकडो खाटा, कचऱ्यात फेकून देण्यात आल्या

आहेत. सीबीडीमधील एसटीपी प्रकल्पाच्या आवारात या खाटांचा ढीग पडला असून पावसात भिजून आता त्यांना गंज लागण्यास सुरुवात झाली आहे.

नवी मुंबई महापालिकेतर्फे रुग्णांवर अद्ययावत उपचार होण्यासाठी ऑक्सिजनयुक्त खाटा, व्हेन्टिलेटरयुक्त खाटांची सुविधा देण्यात आली. त्याचप्रमाणे महापालिकेने शहरात १५ हून अधिक ठिकाणी उपचार केंद्रे उभारली होती. या केंद्रांमध्ये भाडेतत्त्वावर आरोग्य सुविधा उभारण्याऐवजी स्वतः महापालिकेने या सामुग्रीची खरेदी केली. करोना ओसरला की महापालिकेच्या रुग्णालयांत या खाटा बसवून पालिकेची आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करता येईल, हा उद्देश यामागे होता.

ऐरोली, नेरूळ येथील रुग्णालयासह बेलापूर येथील माताबाल रुग्णालयाची प्रशस्त इमारत उभारण्यात आली आहे. येथील रुग्णांसाठी या खाटा उपयोगी पडणार होत्या किंवा करोना उपचार केंद्र बंद झाल्यावर तात्पुरत्या स्वरूपात या रुग्णालयांच्या मोकळ्या इमारतीमध्ये या खाटा ठेवता येणे शक्य होते. या ठिकाणी या खाटा सुरक्षित राहिल्या असत्या. मात्र सध्या बेलापूरच्या एसटीपी प्रकल्पावर या खाटा अक्षरशः फेकण्यात आल्या आहेत.

> कोरोनाकाळात आपल्याकडे अंधाधुंदपणे खरेदी करण्यात आली. ज्या अधिकाऱ्यांकडे ही खरेदीची जबाबदारी होती, त्यांच्याकडे याबाबातचा अहवाल असणे आवश्यक आहे. किती खाटांची खरेदी केली. करोना उपचार केंद्र बंद झाल्यावर या खाटांची व्यवस्था कशी केली, याची चौकशी व्हायला हवी. ज्या अधिकाऱ्यांकडे ही जबाबदारी होती, त्यांचीही चौकशी व्हायला हवी. जनतेच्या पैशांचा अपव्यय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हायला हवी.
>
> – विक्रम शिंदे, माजी आरोग्य समिती सभापती

पाणी लागून या खाटांना गंज येण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे पालिकेने केलेला लाखोंचा खर्च वाया गेला आहे. या खाटांच्या खरेदीची आणि अशा प्रकारे उघड्यावर ते कुणी फेकले, याची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी या निमित्ताने काही जागरूक नागरिकांकडून होऊ लागली आहे.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या

योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

मीना गजानन भोसेकर

संपादकीय

भागवतांचे पाप

मी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही अशी प्रतिज्ञा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी येवला येथील परिषदेत केली त्याला उद्याच्या तेरा तारखेला ८७ वर्षे पूर्ण होतील. बाबासाहेबांच्या त्या घोषणेच्या वेळी म्हणजे १९३५ मध्ये महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ सुरू होऊन साठच्या वर वर्षे लोटली होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वय तेव्हा दहा वर्षांचे होते. म्हणजे, हिंदू समाज एकसंध का नाही याचे स्पष्ट व तर्कशुद्ध उत्तर फुले व आंबेडकरांनी तोवर देऊन ठेवलेच होते. पण, तेव्हा तर सोडाच पण संघ स्वतः शंभरीच्या जवळ आला तरी ती उत्तरे ऐकायला वा मान्य करायला संघ तयार नाही. कारण, हिंदू धर्माचा इतिहास आणि वारसा हा जन्मापासून ते आजपर्यंत प्रचंड गौरवशाली आणि सोन्याने मढवलेला आहे असे संघाला दाखवायचे असते. फुले-आंबेडकरांची मांडणी स्वीकारणे म्हणजे हा स्वतःचाच प्रचार खोडून काढणे होय. या पार्श्वभूमीवर, 'देशातील जातिव्यवस्था हे राष्ट्रीय पाप होते व त्याचे क्षालन करायला हवे', अशा आशयाचे उद्गार सरसंघचालक मोहन भागवत यांनी परवा नागपूरमध्ये काढल्यामुळे सर्वांनाच आश्चर्य वाटले. (मात्र काही बातम्यांमध्ये म्हटले आहे तसे भागवतांनी ब्राम्हण समाजाने हे पापक्षालन करायला हवे असे अजिबात म्हटलेले नाही. किंबहुना, त्यांनी ब्राह्मण असा शब्दही संपूर्ण भाषणात उच्चारलेला नाही. हे राष्ट्राचे पाप आहे असा संदिग्ध उल्लेख त्यांनी केला आहे.) अर्थात, ही कबुली देतानाही त्यांनी रीतसर आणि भरपूर पण-परंतु केले. 'समजा आपल्या पूर्वीच्या पिढ्यांमध्ये अशा चुका झाल्या असे आपण आज म्हणालो म्हणून आपल्या पूर्वजांना कमीपणा येतो असे नव्हे. तेही माणूसच होते व त्यांच्याकडून चुका झाल्या,' असा खुलासा त्यांनी लगोलग केला. भागवत यांनी इथे कटाक्षाने चुका असा शब्द वापरला आहे. जणू काही जे घडलं ते अज्ञानामुळे वा अनावधानाने! जातिभेदाचं शास्त्रार्थाच्या आधारे समर्थन करण्याचा प्रकार ब्रिटिशांच्या आगमनानंतर सुरू झाला अशी मीमांसाही त्यांनी केली. ब्रिटिशांकरवी होणाऱ्या खच्चीकरणाची प्रतिक्रिया म्हणून येथील विद्वानांनी जातिव्यवस्थेला जुन्या शास्त्रांचे कसे आधार आहेत हे दाखवण्याचा प्रयत्न केला असं त्याचं म्हणणं. कुलकर्णी भावंडं, तुकाराम किंवा चोखा महार यांच्या महाराष्ट्रातल्या भागवतांनी हे असलं भारुड रचावं हेच एक पाप किंवा त्यांच्या शब्दात म्हणजे चूक आहे. विशेष म्हणजे असल्या द्वयर्थी बोलण्याला मोठी प्रसिध्दी देऊन भागवतांनी काहीतरी क्रांतिकारक विचार मांडला आहे अशा रीतीने मिडियात पेश केले जात आहे. प्रत्यक्षात संघ परिवाराची भूमिका आहे तीच आहे. याचा पुरावा लगेचच दिल्लीमध्ये पाहायला मिळाला. दिल्लीचे आम आदमी पक्षाचे मंत्री राजेंद्र पाल गौतम यांना रविवारी राजीनामा द्यावा लागला. नवी दिल्लीमध्ये पाच ऑक्टोबर रोजी एका कार्यक्रमात दहा हजार लोकांनी बौध्द धर्म स्वीकारला. त्यावेळी गौतम हजर होते. मी यापुढे राम-कृष्ण, विष्णू, शिव अशा हिंदू देवतांची पूजा करणार नाही, अशी प्रतिज्ञा या कार्यक्रमात घेण्यात आली. त्यावर भाजपच्या नेत्यांनी प्रचंड टीका केली आणि त्यांचेच भाईबंद असलेले आम आदमीवाले बचावात्मक पवित्र्यात गेले. गुजरात निवडणुकांमध्ये हा वादाचा विषय झाला. अखेर गौतम यांना पद सोडावे लागले. वास्तविक त्या कार्यक्रमात घेतल्या गेलेल्या प्रतिज्ञांमध्ये नवीन काहीच नाही. १९५६ मध्ये बाबासाहेबांनी नागपूरच्या दीक्षाभूमीवर धर्मांतर केले तेव्हा ज्या बावीस प्रतिज्ञा घेण्यात आल्या त्याच परवाच्या दिल्लीच्या कार्यक्रमात होत्या. भागवतांची भावना सच्ची असती तर त्यांच्या घोळक्यातल्यांनी या प्रतिज्ञांवरून गहजब केला नसता. उलट आपल्या पूर्वसुरींच्या पापांमुळेच हे सर्व घडते आहे हे मान्य केले असते. त्यावरून आत्मपरीक्षण केले असते. एक शक्यता अशी आहे की, भागवतांचा हा नवा साक्षात्कार अजून खालपर्यंत पोचला नसेल. तसे असेल तर पापक्षालनाचे जाहीर उदाहरण घालून देण्याची नामी संधी भागवतांना मिळाली आहे. त्यांनी या गहजबखोर भाजपवाल्यांची जाहीर निर्भत्सना करावी आणि त्यांना पक्षातून काढून टाकण्याची शिफारस करावी. भागवत हे करू शकतील?

पुन्हा एकदा वेगळया विदर्भाची मागणी

प्रा. अविनाश कोल्हे

स्वतंत्र विदर्भाच्या मागणीनं पुन्हा उचल खाल्ली आहे. एरवी राजकीय नेत्यांचे सल्लागार असणारे प्रशांत किशोर यांचा या आंदोलनाचे पुढचे डावपेच ठरवण्यासाठी सल्ला घेतला जाणार असल्याच्या बातम्या आहेत, त्या निमित्ताने

काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात सत्तांतर होऊन भाजपा आणि शिवसेना (शिंदे गट) यांचे सरकार आल्यापासून विदर्भात 'वेगळे विदर्भ राज्य हवे' या मागणीने उचल खाल्ली आहे. मागच्या आठवडयात विदर्भ राज्य आंदोलन समितीने चंद्रपूर जिल्हयातील अनेक तालुका कार्यालयात या मागणीसाठी निवेदनं दिली. 'आम्हाला विदर्भ वैधानिक विकास मंडळ नको तर विदर्भाचे स्वतंत्र राज्य हवे' ही मागणी केंद्रीय गृहमंत्री अमितजी शहा यांना पाठवली आहे.

तसं पाहिलं तर वेगळया विदर्भाची मागणी फार जुनी आहे. अगदी १ मे १९६० रोजी स्थापन झालेल्या संयुक्त महाराष्ट्रापेक्षाही जुनी. मात्र या ना त्या कारणांनी ही मागणी मागे पडते. दर काही महिन्यांनी, काही वर्षांनी विदर्भाच्या काही भागांत या मागणीसाठी निदर्शनं होतात, धरणे धरली जातात. आता चंद्रपूर भागात या मागणीने जोर पकडलेला दिसत आहे.

स्वतंत्र विदर्भाची मागणी ही आंध्र प्रदेशाचे विभाजन करून निर्माण झालेल्या स्वतंत्र तेलंगणच्या मागणीशी नातं सांगणारी आहे. या दोन्ही मागण्यांच्या मागे 'आर्थिक विकास' हा जबरदस्त मुद्दा होता व आहे. तडाखेबंद आंदोलनं व निवडणूकीत यश यांच्या बळावर 'तेलंगण राष्ट्रीय समिती'ने 'स्वतंत्र तेलंगण' ची मागणी २०१३ साली मान्य करवून घेतली. नेमकी अशीच मागणी विदर्भवाद्यांची आहे.

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यापासून आजपर्यंत विदर्भाचा अनुशेष बघितला तर पश्चिम महाराष्ट्र व मुंबई शहराचा झालेला विकास व विदर्भाचा विकास यातील भयानक तफावत स्पष्ट दिसून येते. 'मराठी' भाषेचा आधार घेऊन व १०५ हुतात्म्यांचे बलिदान देऊन अस्तित्वात आलेल्या संयुक्त महाराष्ट्रात विदर्भाचा विकास झाला नाही. याबद्दलची आकडेबारी डोळयांत अंजन घालणारी आहे. संयुक्त महाराष्ट्रातील विविध घटक भागांच्या विकासाबद्दल १९८४ साली स्थापन करण्यात आलेल्या अर्थतज्ञ डॉ. दांडेकर समितीचा अहवाल जरी डोळयांखालून घातला तरी यावर प्रकाश पडतो. दांडेकर समितीने विदर्भाच्या विकासाचा अनुशेष काढला होता. दांडेकर समितीचा अहवाल येऊनसुद्धा आता सुमारे छत्तीस वर्षे होत आहेत. तरी परिस्थितीत फरक पडलेला नाही.

हा मुद्दा व्यवस्थित समजुन घेतला पाहिजे. देश १९४७ मध्ये स्वतंत्र होण्याअगोदर भारतात अकरा प्रांत होते जेथे इंग्रजांची थेट सत्ता होती. हे प्रांत मिश्र भाषिक वस्तींचे होते इंग्रजांच्या 'फोडा व झोडा' या नीतीनुसारच प्रांतांची बांधणी केलेली होती. उदाहरणार्थ तेव्हाच्या मुंबई प्रांतात सातआठ भाषा बोलणारे समाज होते. गांधींजींना यातील धोके सर्वात आधी जाणवले. त्यांच्या नेतृत्वाखाली नागपुरला १९२० साली जे काँग्रेसचे अधिवेशन भरले होते त्यात 'भाषावार प्रांतरचनेचा' ठराव संमत केला होता. त्याकाळी मराठी भाषिक समाज 'मुंबई प्रांत', 'हैदराबाद संस्थान' व 'मध्य प्रांत व वहाड' या तीन ठिकाणी विभागलेला होता. या तीनपैकी दोन ठिकाणी म्हणजे मुंबई प्रांत व मध्य प्रांत व वहाड येथे इंग्रजांची थेट सत्ता होती ता हैदराबाद संस्थान नबाबांच्या ताब्यात होते. भूगोलाचा विचार केल्यास या तीन तुकडयांना एकत्र करून संयुक्त महाराष्ट्र स्थापन करणे शक्य होते.

यानुसार स्वातंत्रपूर्व काळापासून या मागणीला पाठिंबा मिळत होता. नागपुरनिवासी साहित्यिक ग. त्रयं. माडखोलकर यांनी तर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून या मागणीला पाठिंबा दिला होता. त्या संमेलनात या मागणीला पाठिंबा देणारा ठरावसुद्धा संमत झाला होता. मात्र यातील खाचाखोचा समजुन घेतल्या नाही तर आजच्या स्वतंत्र विदर्भाच्या मागणीची पार्श्वभूमी समजणार नाही.

वर उल्लेख केल्याप्रमाणे आज दिसतो तसा संयुक्त महाराष्ट्र तीन भागात विभागलेला होता. या सर्व भागासाठी म्हणून काँग्रेस पक्षाच्या चार प्रादेशिक समिती होत्या. मुंबई शहरासाठी 'मुंबई प्रदेश काँग्रेस समिती', पश्चिम महाराष्ट्रासाठी 'महाराष्ट्र प्रदेश समिती', नागपुर भागातील (नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि वर्धा) चार जिल्हयांसाठी 'नागपुर प्रदेस काँग्रेस समिती' तर वहाडातील (बुलढाणा, अकोला, यवतमाळ, अमरावती) चार जिल्हयांसाठी 'विदर्भ प्रदेश काँग्रेस समिती' अशी व्यवस्था होती. या चारही समितीत संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीबद्दल एकमत नव्हते. नागपुर प्रदेश काँग्रेस समितीला 'स्वतंत्र विदर्भ' हवा होता, मुंबई प्रदेश काँग्रेस समितीला मुंबई शहराचे वेगळे राज्य हवे तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीला 'संयुक्त महाराष्ट्र' हवा होता. या मागणीला विदर्भ प्रदेश काँग्रेस समितीचा पाठिंबा होता.

यातील आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणणे केंद्र सरकारने १९५५ साली न्यायमुर्ती फाझल अली यांच्या नेतृत्वाखाली स्थापन केलेल्या 'राज्य पुनर्रचना आयोगानेसुद्धा स्वतंत्र विदर्भ असावा, अशी शिफारस केली होती. असे असूनही केंद्र सरकारने मराठी समाजाच्या भाषिक राज्याची मागणी मान्य न करता गुजराथ व महाराष्ट्राचे 'विशाल द्वैभाषिक राज्य' निर्माण केले. यामुळे मराठी समाजाने उग्र आंदोलन केले व एक मे १९६० रोजी 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र' अस्तित्वात आला. त्याआधी सर्व मराठी नेत्यांची १९५३ साली नागपुर येथे बैठक झाली व संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर विदर्भ व मराठवाडा यांच्या विकासासाठी खास निधी दिला जाईल असे मान्य केले होते. हाच तो 'नागपुर करार'.

यशवंतराव चव्हाण होते तोपर्यंत फार काही तक्रारी करायला जागा नव्हती. त्यांच्या नेतृत्वाखाली नागपुर कराराचा योग्य प्रकारे पालन होत होते. नागपुर करारातील एक महत्वाचे कलम म्हणजे संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात फिरत राहील. त्यानुसार यशवंतराव नोव्हेंबर १९६२ दिल्लीला संरक्षण मंत्री या पदावर गेल्यावर त्यांची पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेला नसतांनासुद्धा त्यांनी मुख्यमंत्रीपदी विदर्भातील मारोतराव कन्नमवार यांना नेमले. मारोतरावांचे एक वर्षाच्या आत निधन झाल्यानंतर मुख्यमंत्रीपद विदर्भा कडेच राहिले व वसंतराव नाईक मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. त्यानंतर अनेक वर्षांनी त्यांचे पुतणे सुधारकराव नाईक मुख्यमंत्री झाले. त्यानंतर काँग्रेसच्या पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी सफाईने नागपुर करारातील तपशिलांकडे दुर्लक्ष केले. परिणामी विदर्भाचा विकास खुप मागे पडला.

आता पुन्हा एकदा स्वतंत्र विदर्भाची मागणी चर्चेत आली आहे. हे होणे अटळ होते. याचे कारण म्हणजे एक राष्ट्रीय पक्ष म्हणून भारतीय जनता पार्टीचा धोरणात्मक निर्णय आहे की आपल्या देशात छोटी राज्यं असावीत. या धोरणानुसार भाजपाने स्वतंत्र विदर्भाच्या मागणीला नेहमी पाठिंबा दिलेला आहे. या धोरणाला समोर ठेवून अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधानपदी असतांना छत्तीसगड, उत्तरांचल व झारखंड ही तीन राज्यं इ.स. २००० साली निर्माण केली होती.

या संदर्भात एका आश्वासक मुद्दाची चर्चा केली पाहिजे. ती म्हणजे आपल्या समाजात हळूहळू निर्माण होत असलेली आधूनिक मानसिकता. म्हणूनच ज्या तेलुगू समाजाने १९५३ साली जोरदार आणि प्रसंगी हिंसक आंदोलन करून 'स्वतंत्र आंध्र प्रदेश'ची मागणी मान्य करवून घेतली होती नंतर पाचपन्नास वर्षांनी त्याच आंध्र प्रदेशातून २०१३ साली 'स्वतंत्र तेलंगण' ची निर्मिती झाली. याचा अर्थ असा की आता आपला समाज 'धर्म' किंवा 'भाषा' वगैरेंसारख्या आदिम मुद्दांपेक्षा 'आर्थिक विकास' 'विकासाच्या संधी' वगैरेसारख्या आधूनिक मुद्दांवर लढायला लागला आहे. तेलुगु भाषिकांची जर दोन राज्यं असू शकतात तर मराठी भाषिकांची का नाही, असा प्रश्न उपस्थित होतो.

आज जरी भाजपाची स्वबळावर केंद्रात सत्तेत असला तरी महाराष्ट्रात भाजपाला शिवसेना (शिंदे गट) यांच्याशी युती करावी लागली आहे. एकनाथ शिंदेनी बंड केले नव्हते तोपर्यंत शिवसेनेचा महाराष्ट्राचे तुकडे करण्यास कट्टर विरोध होता. आता परिस्थिती आमुलाग्र बदललेली आहे.

या संदर्भात सर्वात जास्त महत्वाचा मुद्दा म्हणजे नवीन राज्यांची निर्मिती करण्याचे सर्व अधिकार आपल्या राज्यघटनेने संसदेला दिलेले आहेत. यात त्या राज्याच्या विधानसभेला काहीही महत्व नाही. 'स्वतंत्र तेलगंण होऊ नये' अशा आशयाचा आंध्र प्रदेश विधानसभेचा एकमताचा ठराव असूनही तेव्हा केंद्रात सत्तेत असलेल्या काँग्रेस सरकारने संसदेत ठराव संमत करवून घेता व स्वतंत्र तेलंगण अस्तित्वात आले. तेव्हा तर काँग्रेसचे संसदेत स्पष्ट बहुमतसुद्धा नव्हते. आज भाजपाचे संसदेत स्पष्ट बहुमत आहे. मग अडचण कसली? भाजपाधूरिणाने पक्षाच्या 'छोटी राज्य निर्मितीबद्दलच्या धोरणात्मक ठरावाची आठवण करून देण्याची गरज नसावी.

भ्रमणध्वनी ३०९८९ २१० ३८८०

शिक्षणाचा बाजार, अमेरिका-स्टाईल

व्हायरल

शिक्षण = कमोडिटी ; शिक्षक= पुरवठादार आणि विद्यार्थी = कर्जे काढून माल विकत घेणारे ! मग काय होऊ शकते याची झलक ; खुद्द न्यूयॉर्क विश्वविद्यालयातून !

अगदी अलीकडे अमेरिकेतील नावाजलेल्या न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीने (NYU) त्यांच्या ऑरगॅनिक केमिस्ट्री शिकवणाऱ्या एका वरिष्ठ प्राध्यापकाला नोकरीवरून काढले ?

काढले गेलेले प्राध्यापक श्री मेटलँड जोन्स त्यांच्या क्षेत्रात नावाजलेले आहेत, त्यांना शिकवण्याचा अनेक वर्षांचा अनुभव आहे ; तरीदेखील काढले

कारण काय ?

तर त्यांचा विषय घेतलेल्या ८२ विसद्यार्थ्यांनी डीनकडे लेखी सामुदायिक तक्रार केली : कि जोन्स सराचा कोर्स अतिशय कठीण आहे आणि आम्हाला परीक्षेत खूप कमी ग्रेड मिळाल्या आहेत.(जिज्ञासूंनी फक्त गुगल करावे; अमेरिकेतील प्रमुख वृत्तपत्रांनी हि बातमी चालवली आहे)

शाळा / कॉलेजच्या व्यवस्थापकांनी एखाद्या शिक्षक / प्राध्यापकाला काढणे यात म्हटले तर काहीही नवीन नाही ; पण अमेरिकेत घडलेल्या घटनेची मुळे शिक्षण क्षेत्राच्या मोठ्याप्रमाणावर होत असणाऱ्या व्यापारीकरणापर्यंत जाऊन भिडतात ; आणि म्हणून त्याची दखल घेतली पाहिजे , विशेषतः भारतात , ज्या देशात न्यू एड्युकेशन पॉलिसी अंतर्गत कॉलेजेस / विश्वविद्यालयीन क्षेत्राचे व्यापारीकरण होऊ घातले आहे

तुम्ही स्वतः शिक्षण क्षेत्राचे तज्ञ असण्याची गरज नाही ; खालची विचार साखळी वाचताना फक्त कॉमन सेन्स वापरा

खूप मोठ्या देणग्या / कॅपिटेशन फिया घेणारी कॉलेजस घ्या ; त्यांच्यात स्पर्धा आहे; विद्यार्थाने दुसऱ्या नव्हे तर आपल्याच कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा म्हणून ती कॉलेजेस प्रचंड जाहिराती करत असतात

प्रत्येक विश्वविद्यालय जवळपास प्रत्येक विषयात पदवी / पदव्युत्तर डिग्री देऊ करत आहे ; मेडिकल , सर्व प्रकारचे इंजिनियरिंग, व्यवस्थापन शास्त्र तुम्हाला हवा तो माल आमच्याकडे आहे म्हणतात

भरमसाट फिया लावतात ; त्या फिया स्वतःच्या खिशातून भरता येत नसल्यामुळे विध्यार्थी शैक्षणिक कर्जे काढत असतात डोक्यावर मोठे कर्ज घेण्याचा निर्णय घेऊन तो वस्तुमाल विकत घेऊ पहाणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रथमिक अपेक्षा काय असणार ? तर मला चांगले मार्क्स / ग्रेड मिळून , खूप चांगले सर्टिफिकेट मिळावे, मला कॉलेजने नापास तर बिलकुल करूच नये ; मी काय वेडा आहे काय कर्जे काढून नापास व्हायला मी एवढी मोठी किंमत मोजली आहे , त्यामुळे मला दर्जेदार माल (म्हणजे उच्च मार्क्स / ग्रेड असणारे सटिफिकेट) मिळणे हा माझा ग्राहक म्हणून अधिकार आहे आणि जो प्राध्यापक त्याच्या आड येईल त्याची तक्रार आम्ही मालकाकडे करणार ; मालकाने नाही ऐकले तर दुसऱ्या पुरवठादाराकडे जाऊन माल घेणार दुसऱ्या बाजूला कॉलेजेस / विश्वविद्यालयांनी शेकडो कोटी रुपये घालून जमिनी विकत घेऊन , एवढे मोठे इन्फ्रास्ट्रक्चर उभारून डिग्री सर्टिफिकेट पुरवण्याचा धंदा उभा केल्यावर तो वर्षानुवर्षे चालणे आत्यंतिक गरजेचे असणार

पुढच्या वर्षी देखील माझ्या मालाला भरपूर मागणी असण्यासाठी यावर्षी माल विकत घेण्याऱ्या ग्राहकांचे असमाधान मला परवडणारे नाही ; त्यामुळे विद्यार्थी अनुयय करणारी धोरणे आखली पाहिजेत विषयाचे सिलॅबस किती कठीण , किती सोपे ; मूल्यांकन पद्धती किती कठीण / सोप्या ; किती विद्यार्थ्यांना पास / नापास करायचे हे निर्णय शिक्षक नव्हे तर कॉर्पोरेट चे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स घेणार

कनेक्ट द डॉट्स

वर्तमानपत्रात / इलेक्ट्रॉनिक मीडियात जाहिरात विभाग कंटेंट ठरवणार ; पत्रकार , लेखक , कलाकार नाही !

इस्पितळात दर पेशन्ट मागे किती रेव्ह्यून्यू / म्हणून कोणती महागडी ट्रीटमेंट हे व्यवस्थापन ठरवणार ; डॉक्टर्स नाही !आणि शैक्षणिक संस्थात व्यवस्थापक ; शिक्षक नाही !आपल्या डोळ्यात इंप्लांट केलेल्या , जगाकडे फक्त डावे / उजवे , भांडवलशाही / समाजवाद , नफा / तोटा, काळ्या / पांढऱ्या अशा बायनरी भिंगातून बघणे थांबवा मित्रानो

जमिनी गोष्टी या बायनरीच्या चिमटीत न येणाऱ्या , आणि आपले / आपल्या मुलांचे आणि न जन्मलेल्या पिढ्यांचे भवितव्य ठरवणाऱ्या असू शकतात

-संजीव चांदोरकर

लोकसंसद

ज्येष्ठ नागरिकांची एस.टी.महामंडळाकडून उपेक्षा ?

दरवर्षी १ ऑक्टोबरला जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन सर्वत्र विविध कार्यक्रमांनी साजरा होतो.यंदाही तो तसा झाला.विशेषत: त्या दिवशी ज्येष्ठ नागरिकांची सर्वांना प्रकर्षाने आठवण होते ही वस्तुस्थिती आहे. आपल्या देशांत ज्येष्ठ नागरिकांची संख्या सुमारे १४.५ कोटी असून महाराष्ट्रात ती सुमारे १ कोटी ३६ लाखांच्या आसपास आहे.ही संख्या नगण्य निश्चितच नाही.ज्येष्ठ नागरिकांसाठी शासनाने अनेक कल्याणकारी कायदे केलेले आहेत आणि त्यात परिस्थितीनुसार वेळोवेळी भरही पडत असते.शासनाकडून आता वयाची पंच्याहत्तर वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. चा महाराष्ट्रात पूर्ण मोफत प्रवास व ६५ ते ७५ वर्षे वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना सवलतीच्या दरात प्रवास जाहीर केला आहे आणि त्याची कार्यवाही सुरुही झाली आहे हे स्वागतार्हच आहे.वयाची ६० वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठांना एस.टी.प्रवासामध्ये सवलत द्यावी ही ज्येष्ठ नागरिक संघटनांची ब-याच वर्षांची मागणी आहे.ती केव्हा अंमलात येईल तेव्हा येईल. परंतु एस.टीं.स्थानकांवर शारीरिक दुर्बलतेमुळे आगाऊ तिकीट बुकींगसाठी दीर्घकाळ रांगेत उभे राहणे ज्येष्ठ नागरिकांना शक्य नसते ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. करिता ज्येष्ठांसाठी तिकीट खिडकीपाशी वेगळी रांग असावी,खिडकीबाहेर तसा फलक लावण्यात यावा व त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना तिकीटे देणा-या कर्मचाऱ्यांना देण्यात याव्यात अशा प्रकारची मागणी काही पत्रकारांनी, ज्येष्ठ नागरिकांनी त्या-त्या आगार व्यवस्थापकांकडे इतकेच नव्हे तर विभागीय कार्यालयांकडे-करुन देखील अद्याप अनेक ठिकाणी त्याची अंमलबजावणी झालेली नाही असे समजते.तसे असेल तर ती खेदाची बाब आहे.

ज्येष्ठांसाठी तिकीट बुकींगसाठी वेगळी रांग असल्यामुळे एस.टी.महामंडळावर कोणताच वाढीव आर्थिक बोजा पडणार नाहीये.तरीही असे का होते? असा ज्येष्ठांचा रास्त सवाल आहे. तरी वरील सूचनेची सर्व एस.टी.आगारांकडून त्वरित अंमलबजावणी व्हावी अशी तमाम ज्येष्ठांची जोरदार मागणी आहे.तसे न झाल्यास हा प्रश्न सरकार दरबारी न्यावा लागेल अशी ज्येष्ठांची मानसिकता होत चालल्याचे कळते.

-आनंद जोशी, श्रीवर्धन

महानायकाचा वाढदिवस

आज ११ ऑक्टोबर, हिंदी चित्रपट सृष्टीचा शहेनशहा, महानायक अमिताभ बच्चन यांचा वाढदिवस. ११ ऑक्टोबर १९४२ रोजी उत्तरप्रदेश मधील अलाहाबाद येथे जन्मलेल्या अमिताभ यांच्या वडिलांचे (हरीवंशराय बच्चन) मूळ नाव श्रीवास्तव असे असले तरी ते बच्चन या टोपण नावाने कविता प्रसिद्ध करीत त्यामुळे अमिताभ यांनीही चित्रपट सृष्टीत आल्यावर बच्चन हेच टोपणनाव आडनाव म्हणून वापरण्यास सुरवात केली. पुढे संपूर्ण कुटुंबाचेच बच्चन हेच आडनाव व्यवहारात रूढ झाले. अमिताभ बच्चन यांचे शालेय शिक्षण ज्ञानप्रबोधिनी आणि बॉईज हायस्कूल येथे झाले. दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयातून त्यांनी विज्ञानाची पदवी घेतली. त्यानंतर काही काळ त्यांनी कोलकाता येथील एका कंपनीत काम केले पण तिथे त्यांचे मन रमले नाही. तेथून ते हिंदी चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी मुंबईत आले आणि चित्रपटात कामाच्या संधी शोधू लागले. अमिताभ बच्चन यांना ख्वाजा अहमद अब्बास यांच्या सात हिंदुस्थानी या चित्रपटात संधी मिळाली. दुर्दैवाने हा चित्रपट चालला नाही. अमिताभ यांचाही म्हणावा तसा प्रभाव पडला नाही. अमिताभ बच्चन यांनी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले तेंव्हा देव आनंद, शम्मी कपूर, शशी कपूर, राजेश खन्ना, विनोद खन्ना, राजेंद्र कुमार, धर्मेंद्र, जितेंद्र अशा देखण्या कलाकारांची चलती होती. अशा काळात अमिताभ तग धरतील का अशी साशंकता होती त्यात त्यांचा पहिलाच चित्रपट जोरात आपटला मात्र त्यांनी हार मानली नाही. सलग सात चित्रपट आपटूनही ते डगमगले नाही. १९७३ साली आलेल्या प्रकाश मेहरा यांच्या जंजिर या चित्रपटाने अमिताभ यांना खरा ब्रेक मिळवून दिला. या चित्रपटातील पोलीस इन्स्पेक्टरची त्यांची भूमिका खूप गाजली. या चित्रपटानंतर त्यांची अँग्री यंग मॅन अशी जनमानसात प्रतिमा निर्माण झाली. प्रचलित समाज व्यवस्थेच्या विरोधात बंडखोरी व क्रोध व्यक्त करणाऱ्या युवकांचे प्रतिनिधित्व त्यांनी पडद्यावर साकारले त्यामुळेच त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना आपल्याशा वाटल्या. दग्दर्शक ऋषिकेश मुखर्जी यांच्या आनंद या चित्रपटात त्यांना सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कारही त्यांना मिळाला. नमक हराम या चित्रपटातील त्यांची भूमिकाही लक्षवेधक ठरली. ७० आणि ८० चे दशक अमिताभ यांनी अक्षरशः गाजवून सोडले. त्यांनी काही चित्रपटात पार्श्वगायनही केले. मिस्टर नटवरलाल या चित्रपटातील पार्श्वगायनासाठी त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कारही मिळाला होता. १९८४ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला मात्र हा प्रांत आपला नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणाला रामराम ठोकला. आज ते वयाची ८० वर्ष पूर्ण करत असले तरी तरुणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह आहे. त्यांच्या सारखा प्रतिभावान कलाकार युगातून एकदाच जन्माला येतो. त्यांच्या सारखा कलाकार भारतातच नाही तर जगात झाला नाही आणि पुढेही होणार नाही. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतानाच त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

- श्याम ठाणेदार दौंड

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्युहम् ।।२९।।

समः समभाव; **अहम्**-मी, **सर्व-भुतेषु**-सर्व जीवांच्या ठिकाणी; न-कोणाचाच नाही; **मे**-मला; **द्वेष्यः**-द्वेषपूर्ण; **अस्ति**-आहे; न-तसेच नाही; **प्रियः**-प्रिय; **ये**-जे; **भजन्ति**-दिव्य सेवा करतात; **तु**-परंतु; **माम्**-माझी; **भक्त्या**-भक्तिभावाने; **मयि**-माझ्यामध्ये आहेत; **ते**-असे मनुष्य; **तेषु**- त्यांच्यामध्ये; **च**-सुद्धा; **अपि**-निश्चितच; अहम्-मी.

मी कोणाचा द्वेष करीत नाही,तसेच कोणाशी पक्षपातही करीत नाही. सर्वजण मनात सारखेच आहेत, परंतु जो कोणी भक्तीभावाने माझी सेवा करतो तो माझा मित्र आहे, माझ्या ठायी स्थित आहे आणि मी सुद्धा त्याचा मित्र आहे.

तात्पर्यः या ठिकाणी कोणी प्रश्न करील की, जर श्रीकृष्णांना सर्वजण सारखेच असतील आणि कोणीच विशेष प्रिय नसेल तर मग, त्यांची दिव्य सेवा करण्यात सदैव निमग्न असलेले भक्त त्यांना विशेष प्रिय का असतात? परंतु त्या ठिकाणी भेद दर्शविण्याचा संभवच नाही. हे तर साहजिकच आहे. या भौतिक जगतात मनुष्य कितीही उदा प्रवृत्तीचा असला तरीत्याला आपली मुळेबाळे विशेष प्रिय असतात. भगवंत म्हणतात की, प्रत्येक जीव मग तो कोणत्याही रुपातला असो तो माझा प्रिय आहे आणि म्हणून ते प्रत्येकाला जीवनाश्यक वस्तूंचा विपुल प्रमाणात पुरवठा करतात. भगवंत मेघासमान आहेत. मेघ हा सर्वत्र पाऊस पाडतो, मग तो खडक असो जमीन असो अथवा पाणी असो, परंतु आपल्या भक्ताकडे ते विशेष ध्यान देतात. अशा भक्तांचा या ठिकाणी विशेष उल्लेख करण्यात आला आहे. हे भक्त सदैव कृष्णभावनाभावित असतात आणि म्हणून ते श्रीकष्णांमध्ये स्थित असतात. 'कृष्णभावनामृत' शब्दच दर्शवितो की, जे कृष्णभावनाभावित असतात. ते भगवंतांच्या ठायी स्थित असलेले चालते बोलते योगीच असतात. या ठिकाणी भगवंत स्पष्टपणे म्हणतात की, मयि ते-ते माझ्यामध्ये स्थित आहेत. यावरुन साहजिकच आहे की, भगवतंही त्यांच्यामध्ये स्थित आहेत. ही गोष्ट परस्परपूरकच आहे. यावरुन ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् या श्लोकाचेही स्पष्टीकरण होते, 'जो ज्या प्रमाणात मला शरण येतो त्या प्रमाणात मी त्याची काळजी घेतो.' भगवंत आणि भक्त दोघेही चेतन असल्यामुळे हे अलैकिक आदानप्रदान होते, हिरा जेव्हा सोन्याच्या अंगठीत बसविला जातो तेव्हा तो अत्यंत सुंदर दिसतो त्यामुळे सोनयाचे सौंदर्य वाढते आणि त्याचबरोबर हिऱ्याचेही सौंदर्य वाढते. भगवंत आणि जीव दोघेही नित्य प्रकाशमान असतात आणि जेव्हा जीव भगवत्सेवा करण्यास प्रवृत्त होता तेव्हा त्या जीवाला सोन्याची शोभा येते. भगवंत हे हिऱ्याप्रमाणे आहेत आणि म्हणून हा मणिकांचन योग अत्यंत सुंदर दिसतो. जीवांना त्यांच्या विशुद्धावस

महत्त्वाचे

ईद-ए-मिलादच्या निमित्ताने रक्तदान

। कर्जत । वार्ताहर।

ईद-ए-मिलादच्या निमित्ताने मुस्लिम समाज कर्जततर्फे रक्तदान शिबिरचे आयोजन करण्यात आले होते. १२१ रक्तदात्यांनी केले. जामा मस्जिद कर्जत येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सैदु शेख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सय्यद मुश्ताक़ ईद्रूस, डॉ. आखलाक शेख, सलीम मुजावर, नदीम खान, निसार शेख, अब्बास शेख, रशिद मुजावर, इस्माइल दीवान, नदीम कुरेशी, नवाज़ तांबोळी, हामिद खैराट, रमीज़ बिद्री, इम्रान अनवर,अज़ीज़ शेख़, एजाज़ मुल्ला, सरताज खान, वहाब मुजावर, हैदर आदी उपस्थित होते.

मोरा बंदरात गाळाची समस्या कायम

। उरण । वार्ताहर ।

मोरा ते मुंबई जलप्रवास विना अडथळा सुरू रहावा, यासाठी चार महिन्यांपूर्वी मोरा बंदरातील गाळ काढण्यासाठी चार कोटी खर्च आला होता. मात्र, बंदरात गाळाची समस्या कायम राहिल्याने मागील चार दिवसांपासून ठराविक कालावधीसाठी प्रवासी वाहतूक बंद ठेवण्याची वेळ येऊन ठेपली आहे. वारंवार कोट्यावधींच्या खर्चानंतरही गाळाची समस्या कायम राहिल्याने प्रवासी आणि नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण

मोरा बंदरातून भाऊचा धक्का येथुन मुंबईत पोहोचण्यासाठी अवघा एक तास लागतो. प्रदूषण, वाहतूक कोंडी आदी त्रासापासून दूर ठेवणारा अत्यंत जवळचा आणि फक्त ८० रुपयात मुंबईत पोहचवणारा स्वस्त अशी मोरा -भाऊचा धक्का सागरी मार्गाची ओळख आहे. गाळामुळे ओहटीच्यावेळी वाहतूक बंद होण्याची सर्वात मोठी समस्या बंदरात आहे. बंदरात सातत्याने गाळ साचत असल्याने समुद्राच्या ओहोटीच्या वेळी प्रवासी बोटी मोरा बंदरात गाळात रुतून बसतात. त्यामुळे प्रवाशांना घेऊन येणाऱ्या प्रवासी बोटी बंदरापर्यंत पोहचू शकत नाहीत.

परिणामी, दररोज कामासाठी मुंबईत जाणाऱ्या हजारो प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होते. त्यामुळे प्रशासनाने याकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन बंदरातील गाळ काढण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

वॉटर फिल्टरचे वाटप

। चिरनेर । वार्ताहर ।

आदिवासी बांधव यांच्या आरोग्याचा विचार करत ४ लाईफ कंपनीतर्फे सोलर वॉटर फिल्टर जारचे वाटप करण्यात आले. पाण्याची टंचाई आणि उन्हाळ्यात आदिवासी बांधवाना स्वच्छ पाणी मिळावे आणि त्याचे आरोग्य सुधारावे यासाठी शमींदर कोचर, संतोष खंडागले, जयश्री खंडाग, यांच्या सौजन्याने व सारडे विकास मंच, व साई कृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी यांच्या आयोजनातुन सोलरवर चालणारे सावा वॉटर फिल्टर जारचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक नागेंद्र म्हात्रे यांनी केले. यावेळी शमीनदर कोचर, रोहित पाटील, रामनाथ पाटील, हरीश म्हात्रे, त्रिजन पाटील, महेश पाटील, नागेंद्र म्हात्रे, राकेश पाटील आदी जण उपस्थित होते.

खारघरमध्ये अज्ञातांकडून झाडांची कत्तल

। पनवेल । वार्ताहर ।

खारघर सेक्टर ३५ ई मध्ये रस्त्याच्याकडेला असलेल्या झाडांची अज्ञातांकडून कत्तल करण्यात आली आहे. याबाबतची तक्रार विज्ञान-तंत्रज्ञान व कौशल्य विकास विभागाचे जिल्हा अध्यक्ष मुसादीफ मोडक यांनी पालिका अधिकाऱ्यांकडे केली आहे.

पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याने प्रशासकीय पातळीवर विविध उपाय केले जात आहेत. राज्य शासनातर्फे झाडे लावण्याच्या मोहिमा राबवण्यात येत आहेत. असे असताना सेक्टर ३५ ई, प्रोव्हिसो कॉम्प्लेक्स सोसायटीसमोरील रस्त्याच्या कडेला असलेल्या चार ते पाच मोठ्या झाडांची अज्ञातांकडून कत्तल करण्यात आली आहे.

या प्रकारामुळे पर्यावरणप्रेमींमधून संताप व्यक्त केला जात आहे. तसेच संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन पालिका आणि सिडकोने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, रस्त्याच्या कडेला असलेली दुकाने ग्राहकांना दिसावीत, म्हणून ही झाडे तोडण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे.

> **खारघर सेक्टर ३५ मधील पदपथावरील झाडांची छाटणी केली आहे. कोणतेही झाड तोडण्यापूर्वी पालिकेकडून परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगी नसताना झाडे तोडली असतील, तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.**
> **- कैलास गावडे, उपायुक्त , पनवेल महापालिका**

अँटिकरप्शन फाऊंडेशनतर्फे आरोग्य तपासणी

। मुरूड। वार्ताहर।

अँटिकरप्शन फाउंडेशन ऑफ इंडिया मुरुडतर्फे आरोग्य तपासणी शिबिर व औषध वाटप कार्यक्रम आदिवासीवाडी विहूर येथे घेण्यात आला. या शिबिराकरिता डॉ. अमित बेनकर व डॉ. संजय पाटील उपस्थित होते. यावेळी रुपेश दांडेकर, अमोल शेडगे, राजू म्हशीलकर, अमरदिप साळुंके, अभिजित भायदे, विवेक फुलमाळी राहुल कासार, संदेश माळी, राहुल लाडगे, मंगेश कौलकर, महेश साळुंखे मंगेश रणदिवे, अंगणवाडी सेविका तसेच आशा वर्कर्स, आदिवासीवाडी अध्यक्ष उपस्थित होते. धनंजय म्हात्रे, प्रिया कर्णिक यांचे मार्गदर्शन लाभले.

श्रीक्षेत्र पंचायतन मंदिरात रासउत्सव

। पनवेल । वार्ताहर ।

जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून श्रीक्षेत्र पंचायतन मंदिराची स्थापना नढाळ चौक येथे करण्यात आली. या मंदिर परिसरात स्थापनेपासून विविध धार्मिक-अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येतात. कोजागिरी पौर्णिमेच्या पूर्वसंध्येला खांदा कॉलनी यांच्या नियोजनाखाली एकदिवसीय रासउत्सव आयोजन करण्यात आले होते.

नवी मुंबई, ठाणे, रायगड परिसरातील सर्व स्वामीनारायण संप्रदायाचे सत्संगी बांधव या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाप्रसाद, रास गरबा उत्सव, संत मंडळींचे दर्शन सोहळा अशा प्रकारे धार्मिक विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला चॅरिटेबल संस्थेचे संस्थापक जे. एम. म्हात्रे उपस्थित होते.

रा.स्व. संघाचे मुरुडमध्ये पथसंचलन

। आगरदांडा । प्रतिनिधी।

मुरुड तालुका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विजयादशमीनिमित्त मुरुड शहरात घोषाच्या तालावर पथसंचलन करण्यात आले. शिवाजी चौक-गोल बंगला-लक्ष्मी नारायण मंदिर- आझाद चौक-बाजार पेठ-श्रीराम भवन ते श्रीकाळ भैरव मंदिरापर्यंत रॅली काढण्यात आली. यामध्ये १५ गावांतून ५४ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

तालुका कार्यवाह समीर उपाध्ये, तालुका सहकार्यवाह प्रा. अनुप सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली संचलन सोहळ्याचा समारोप अत्यंत शिस्तबद्ध रितीने श्रीकाळ भैरव मंदिराच्या प्रांगणात करण्यात आला. यावेळी हिंदू एज्यु. सोसायटीचे अध्यक्ष दिलीप जोशी, प्रा. मेघराज जाधव यांच्या हस्ते शस्त्रपूजन करण्यात आले. कुमार आर्कशी यांनी संघटन गठे चलो सुपंथ पर बढे चलो हे सांधिक पद्य गायले. मुरुड पोलीस ठाण्यातर्फे पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

विमला तलावातील भगदाड वाढले

। उरण । वार्ताहर ।

उरण नगरपरिषदेच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या विमला तलावातील पदपथाला पडलेले भगदाड वाढले आहे. त्यामुळे विरंगुळा म्हणून तलावात येणाऱ्या लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी व तलावातून ये जा करणाऱ्या शहरातील नागरिकांना अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. नगरपरिषदेने येथील नागरिकांसाठी विरंगुळा व शहरातील लहानग्यांना खेळण्यासाठी एकमेव ठिकाण विमला तलाव आहे. या विमला तलावातील पदपथावर भले मोठे भगदाड पडले आहे.

तलावाला लागून असलेल्या पदपथाला हे भगदाड पडल्याने हळूहळू पाण्यातील मातीची धस वाढू लागली आहे. त्यामुळे भगदाड मोठं होऊ लागले आहे. या पदपथावरून अनेक नागरिक, विद्यार्थी ये-जा करीत आहेत. तसेच अनेक नागरिक या पदपथावरुन व्यायाम करणाऱ्यांची संख्या अधिकची आहे. त्यामुळे सातत्याची वर्दळ असलेल्या या पदपथाची दुरुस्ती लवकरात लवकर करण्याची आवश्यकता असतांना नागरपरिषदेचे या भगडाडकडे दुर्लक्ष होत आहे. परिणामी, एखादा अपघात होण्याची श्यक्यता आहे.

> **नगरपरिषदेकडून डीपीडीसीमधून तलावाच्या दुरुस्तीसाठी १५ लाख रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली आहे. हा निधी आल्यानंतर विमला तलावाच्या दुरुस्तीचे काम केले जाईल.**
> **- झेड.आर.माने, अभियंता, उरण नगरपरिषद**

एचआयव्हीग्रस्तांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन

। पनवेल । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, वडाळा, मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार एआरटी केंद्र लोधिवली, खालापूर येथे तालुका विधी सेवा प्राधिकरण, खालापूर यांच्या सहकार्याने कायदेविषयक मार्गदर्शनपर कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यक्रमास रिलायन्स हॉस्पिटल, लोधीवली संचालक डॉ. रणजित खंदारे, डापकुचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांनी रायगड जिल्ह्यामधील एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींना देण्यात येणाऱ्या शासकीय सेवा सुविधांबाबत सविस्तर माहिती देऊन त्यांना शासकीय सेवा सवलती सहज मिळाव्यात याकरिता संजय गांधी निराधार योजना, जिल्हाधिकारी कार्यालयात एक खिडकी योजना सुरु करून शासकीय सेवा देण्यात येणार आहेत.

याकरिता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांची मदत घेण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी एआरटी केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. पर्णा बार्डोलोई यांनी एआरटीविषयी सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमास खालापूर न्यायालयातील दिवाणी न्यायाधीश आर. डी. वाबळे व सहदिवाणी न्यायाधीश पी. एम. माने हे हजर होते. त्यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात एचआयव्हीसह जगणारा व्यक्ती व कायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. रायगडमधील प्रत्येक तालुक्यातील न्यायालयामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय असल्याची माहिती दिली. संबंधित तालुक्यातील महिलांनी तेथील विधी सेवा प्राधिकरण कार्यालयामध्ये जाऊन कायदेविषयक मदत घेण्याबाबत आवाहन यावेळी करण्यात आले.

एमजीएम हॉस्पिटल कामोठे-पनवेल मधील एआरटी केंद्राचे संचालक डॉ.सुधीर कदम यांनी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे हे सन १९९८ पासून एचआयव्ही प्रतिबंधाकरिता कार्य करीत असून आता एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींना रुग्णालयातच एआरटी केंद्र सुरु करून एआरटी उपचार देत असल्याचे सांगितले.

प्रभारी जिल्हा न्यायाधीश तथा पनवेल सह दिवाणी न्यायाधीश जे.डी.वाडने यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणामध्ये सन २०१७ च्या कायद्याबाबत तसेच एचआयव्ही सह जगणाऱ्या व्यक्तींना असणाऱ्या हक्क व अधिकारांबाबत सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता जिल्हा सहाय्यक लेखा रवींद्र कदम, एआरटी केंद्र लोधिवली, खालापूरच्या समुपदेशक तारा इंगळे, एआरटी केंद्र लोधिवली, एम. जी. एम. हॉस्पिटल, कामोठे-पनवेल येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी योगदान दिले.

प्रा. शिक्षक संघाच्या कार्यालयाचे उद्घाटन

। म्हसळा । वार्ताहर ।

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ शाखा म्हसळाच्या महिला आघाडी प्रमुख तथा रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक पतपेढी लि. पेण संचालिका सुमित्रा खेडेकर व त्यांचे पती विलास खेडेकर यांनी आपल्या निवासस्थानी विना मोबदला दिलेल्या जागेत संघटना कार्यालयाचे उद्घाटन दसरानिमित्त पार पडले.

म्हसळा तालुका शाखेच्या अध्यक्षा शुभदा दातार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या उद्घाटन कार्यक्रमास जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे कार्याध्यक्ष किशोर मोहिते, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख विलास यादव, दिलीप करंबे, सुनील उमरोटकर, पुष्पलता तांबट, अनंत येलवे, संजय खांबेटे, प्रा. महंमद शेख, प्रा. अंगद कांबळे, माध्यमिक शिक्षक संघटना अध्यक्ष नितीन पाटील, अनिल पोतदार, विलास खेडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. खेडेकर यांनी, तर सूत्रसंचलन रमेश जाधव यांनी केले. शेवटी शशिकांत भिंगारदिवे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष विजय घाटगे, समीर पास्टे, सुनील साठे, भानुदास राठोड, शिवाजी चव्हाण, नागेश शेवडीकर, प्रवीण सोनवणे, विपुल चक्करवार यांनी सहकार्य केले. कार्यक्रमासाठी शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

श्रमिक विद्यालय वन्यजीव सप्ताह

। खांब-रोहा । वार्ताहर ।

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे वन्यजीव सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी १ ते ७ ऑक्टोबर दरम्यान वन्यजीव सप्ताह सर्वत्र साजरा केला जातो. त्या अनुषंगाने श्रमिक विद्यालय चिल्हे व सामाजिक वनीकरण व वन विभाग, रोहा यांच्या विद्यमाने सदरचा सप्ताह विद्यालयात साजरा करण्यात आला.

यावेळी सामाजिक वनीकरण लोहाचे दिलिप वाघे, सुरेश वाघमारे, दिपक जगताप, नरेंद्र माळी, अनुराधा मोरे, ज्योत्स्ना सबरदंडे आदी उपस्थित होते.

सामाजिक वनीकरणाचे वाघे मार्गदर्शन करताना म्हणाले की, वन्यजीव हे पर्यावरण साखळीतील महत्त्वाचे घटक असून त्यांची शिकार न करता त्यांना जीवदान दिले पाहिजे. दिवसेंदिवस वन्यजीवांची संख्या कमी कमी होत चालली असून ही परिस्थिती अशीच राहिली तर पर्यावरणाचा समतोल ढासळला जाईल व त्याचे भविष्यात खुप दुष्परिणाम भोगावे लागतील. यासाठीच वन्यजीवांचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे.

या सप्ताहानिमित्त सामाजिक वनीकरण व वन विभाग, रोहा यांच्या वतीने चित्रकला व निबंध स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते.

शैक्षणिक साहित्याचे वाटप

। खांब-रोहा । वार्ताहर ।

रोहे तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल विठ्ठलवाडी-राजखलाटी येथील विद्यार्थ्यांना मराठी व्हिजन फाऊंडेशनच्यावतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी अध्यक्षा रिया शिंदे, अर्चना दळवी, खुशाली नवतुरे, समिक्षानलावडे, स्वप्नालीचव्हाण, मंगेश जाधव, हरिश्चंद्र चव्हाण, सदाशिव चव्हाण, अर्चना मरवडे, गौतम जाधव, सुप्रिया जाधव, ऋषिकेश महाडिक, सुजीत लोखंडे, नितेश पोटफोडे आदी शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार सहाय्यक शिक्षिका शिल्पा मरवडे यांनी व्यक्त केले.

श्रीया फाऊंडेशनतर्फे मार्गदर्शन

। उरण । वार्ताहर ।

श्रीया फाऊंडेशन पाले व कॉमन सर्विस सेंटर व शिक्षा अकॅडमी बोकडवीरा यांच्या वतीने सरकारी नोकरी, पोलीस भरती आणि सरळ सेवा भरती पूर्व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

प्रशांत पाटील, चंद्रकांत म्हात्रे, पोसुराम म्हात्रे, श्रीकांत म्हात्रे, स्मिता म्हात्रे, सुनील वर्तक, राहुल ठाकूर, दिपिका ठाकूर, संदीप म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलींद म्हात्रे व दिपिका ठाकूर किरण परमार यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन रमाकांत म्हात्रे, विनोद म्हात्रे, राजेश म्हात्रे, प्रितम म्हात्रे, अक्षय म्हात्रे, मच्छिंद्र म्हात्रे यांनी केले.

खांदा वसाहतीत डेंग्यूचा शिरकाव

नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

पनवेल पालिका हद्दीत डेंग्यूने शिरकाव केला आहे. खांदा वसाहतीमधील एकाच रहिवासी इमारतीत डेंग्यूचे पाच रुग्ण सापडले आहेत. पालिकेची वैद्यकीय आरोग्य यंत्रणा मात्र या प्रकारापासून अनभिज्ञ असल्याचे पाहायला मिळत आहे. पालिका हद्दीतील खांदा वसाहत येथील सेक्टर ११ मधील भूखंड क्रमांक २२ वर रिगलीया हि १७६ सदनिका असलेली इमारत आहे. या इमारतीत डेंग्यूचा फैलाव झाला आहे. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.



साथीच्या आजाराचा फैलाव रोखण्यासाठी आरोग्य विभागाने पावले उचलणे अपेक्षित असते. पालिका प्रशासनाकडून देखील अशा पद्धतीची पावले उचलण्यात येत आहेत. डेंग्यू, मलेरियाच्या डासांची उत्पत्ती होऊ नये, याकरीता आरोग्य यंत्रणेमार्फत डासांच्या अळ्यांची पैदास होण्याची शक्यता असलेल्या भागात धूरफवारणी, औषध फवारणी करण्यात येत आहे. पालिकेकडून करण्यात येत असलेल्या या प्रयत्नानंतरही पालिका हद्दीत डेंग्युचे रुग्ण आढळून येत असल्याने सध्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

> खासगी रुग्णालयात एखादा रुग्ण उपचारासाठी आला असल्यास त्याची माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाला देण्याच्या सूचना खासगी रुग्णालयांना देण्यात आल्या आहेत. साथीचे आजार पसरू नये, याकरीता आरोग्य विभाग सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे.
> _ डॉ रेहाना मुजावर, आरोग्य अधिकारी

महिनाभरात ११ डेंग्यूचे रुग्ण

पनवेल पालिका हद्दीत महिनाभरात ११ डेंग्यूचे रुग्ण सापडले असल्याची माहिती आरोग्य विभागाच्या अधिकारी डॉ.रेहाना मुजावर यांनी दिली आहे. खांदा वसाहतीमधील रुग्णांची माहिती मिळताच इमारतीमध्ये अळ्यांची पैदास होण्याची शक्यता असलेल्या ठिकाणचा शोध घेऊन औषध फवारणी करण्याच्या सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना करण्यात आल्या आहेत.

अवैध पिस्तूल बाळगणाऱ्याला अटक

। उरण । वार्ताहर ।

अवैध पिस्तूल बाळगणाऱ्याला गुन्हे शाखा पोलिसांनी न्हावा गावातून अटक केली आहे. त्याच्याकडून देशी बनावटीच्या कट्ट्यासह दोन काडतूस जप्त करण्यात आले आहेत. गुरुवारी रात्री न्हावा गावात सापळा रचून ही कारवाई करण्यात आली आहे.

न्हावा गावामध्ये अवैध पिस्तूल घेऊन येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाला मिळाली होती. त्यानुसार मध्यवर्ती कक्षाचे वरिष्ठ निरीक्षक विजयसिंह भोसले यांनी उपनिरीक्षक संजय रेड्डी, हवालदार शिवाजी राऊत त्यांनी गुरुवारी रात्री न्हावा गावातील मैदानालगत सापळा रचला होता. यावेळी तिथे संशयास्पद वावरणाऱ्या एकाला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले.

देशी कट्ट्यासह दोन काडतुसे जप्त

त्याच्या झडतीमध्ये त्याच्याकडे देशी बनावटीचे पिस्तूल व दोन काडतूस आढळून आले. त्याच्यावर न्हावा शेवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. तर त्याने हे पिस्तूल कोणाकडून खरेदी केले व त्याचा वापर कशासाठी केला जाणार होता याचा अधिक तपास गुन्हे शाखा पोलीस करत आहेत.

महत्त्वाचे

पत्रकाराला मारहाण

। पनवेल । वार्ताहर ।

खारघरमध्ये एका अज्ञात मोटरसायकलस्वाराने वाहन बाजू देण्याच्या कारणांवरून पत्रकाराला मारहाण केल्याची घटना घडली आहे. याबाबतची तक्रार खारघर पोलीस स्थानकात दाखल करण्यात आली आहे. खारघरमधील नवलोकहित दृष्टी या साप्ताहिकाचे संपादक संदेश सोनमळे यांना एका अज्ञात मोटर सायकल स्वाराने सेंट्रल पार्कच्या रस्त्यावरती वाहनाला बाजू देण्याच्या कारणांवरून मारहाण केली. याबाबतची तक्रार संदेश सोनमळे यांनी खारघर पोलीस स्थानकात दाखल केली असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

बंद घरात चोरी

। पनवेल । वार्ताहर ।

नवीन पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील आपटा फाटा येथील श्री स्वामी समर्थ मंदिर व जवळील इमारतीमधील एक घरामध्ये चोरी झाली आहे. चोरट्यांनी दानपेटीसह बंद घरातील एक लाख रुपयांचे दागिने चोरून नेले आहेत. दानपेटीमध्ये नक्की किती रक्कम होती हे निश्चित नसल्याने किती ऐवज चोरीला गेला हे स्पष्ट झालेले नाही. या दोन्ही घटनांविषयी नवीन पनवेल पोलीस स्टेशनमध्ये घरफोडीचा गुन्हा दाखल झाला आहे.

नेरळमध्ये रुळाच्या दुरुस्तीला सुरुवात

। नेरळ । वार्ताहर ।

मुंबई पुणे रेल्वे मार्गावरील कर्जत एन्डकडील नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकापुढे असलेले रेल्वे फाटकातील रुळाखाली असलेला पृष्ठभागाची दुरुस्ती करण्यासाठी फाटक बंद करण्यात आले आहे. मात्र जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार तब्बल दीड दिवस उशिराने फाटक वाहनांच्या वाहतुकीस बंद करण्यात आले आहे. दर दोन वर्षांनी असा ब्लॉक घेऊन फाटक बंद ठेवून रुळाखालील पृष्ठभागाचे दुरुस्तीचे काम केले जाते.

७ ते १२ ऑक्टोबर सकाळ पर्यंत फाटक बंद तेहवले जाणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र रेल्वेकडून जाहीर केल्यापासून तब्बल दीड दिवस फाटक उघडेच होते. मध्य रेल्वेच्या या अनियोजनाचा फटका वाहनचालक यानं बसला होता. फाटक बंद असल्याची माहिती असलेली वाहने पाच ते दहा किलोमीटर अंतर अधिक पार करून दामत किंवा आंबिवली येथील फाटकातून आपली वाहने घेऊन प्रवास करीत होती.

१२ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजता फाटक उघडले जाणार होते, ते फाटक कदाचित बुधवीराने उघडले जाऊ शकते. दुसरीकडे सलग पाचहुन अधिक दिवस फाटक बंद ठेवले जात असल्याने वाहनचालकांची आर्थिक नुकसान होत आहे. त्यांची वाहने अधिक किलोमीटर अंतर पार करून आपल्या इच्छित स्थळी जात असताना मोठ्या प्रमाणात वाढीव इंधन वाहनचालक यांना वापरावे लागत आहे. त्यामुळे निर्धारित काम १२ ऑक्टोबर रोपजी सकाळ पर्यंत संपवावे अशी मागणी केली जात आहे.

गणित शैक्षणिक साहित्य मेळावा

। उरण । वार्ताहर ।

प्राथमिक शाळा धाकटीजुई व प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गणित शैक्षणिक साहित्य मेळावा व प्रदर्शन शुक्रवार (दि.७) राजिप प्राथमिक शाळा धाकटीजुई येथे आयोजन केले.

यावेळी पालकांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले गणित शैक्षणिक साहित्य व प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनद्वारे गणित शैक्षणिक साहित्याची मांडणी गणित मेळावाद्वारे प्रदर्शन भरवून सादरीकरण व मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी व पालकवर्गाने या गणित मेळाव्यातून शैक्षणिक साहित्याची उपयुक्तता व मूलभूत व्यावहारिक माहिती समजावून घेतली. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विलास गावंड, मनिषा गिरी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिपक घरत, सुनिल पाटील, प्राजक्ता म्हात्रे, पालक यांनी मेहनत घेतली.

नियमबाह्य फटाका स्टॉलवर कारवाई करा

। महाड । प्रतिनिधी।

महाड शहरातील मध्यवर्ती परिसर म्हणून ओळखला जाणारा शिवाजी चौक या भागामध्ये नियमबाह्य फटाक्याचे स्टॉल लावण्याचे प्रयत्न केले जात आहे. प्रशासनाकडून स्टॉल लावण्यासाठी परवानगी मिळावी यासाठी दुकानदार राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असल्याचे समजते. दाट लोक वस्ती, प्रमुख वाहतुकीचा परिसरात, फटाकेचे स्टॉल लावण्यास परवानगी देऊ नये अशी मागणी नागरिकांनी केली आहे. सर्व फटाक्यांचे स्टॉल काकर तळे येथील महाड नगरपालिकेच्या भिलारे मैदानावर लावण्यात यावे अशी मागणी केली जात आहे.

काही दिवसांनी सुरू होणाऱ्या दिवाळी उत्सवानिमित्त सर्वत्र फटाक्यांची मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते. शहरात देखील अनेक फटाक्याचे स्टॉल लावले जातात. शहरातील प्रमुख रहदारीचा परिसर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक, लायन्स क्लब बिल्डिंग परिसर, महात्मा गांधी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, बाजार पेठ या परिसरामध्ये फटाके स्टॉल लावले जातात. हा परिसर रहदारीचा असल्याने येथे फटाक्याचे स्टॉल लावणे सर्वस्वी धोक्याचे आहे. तसेच दुचाकी, चार चाकी वाहनांचे पार्किंग शिवाजी चौक परिसरात केले जाते. अशा वरदळीच्या परिसरात फटाक्यांसारखे स्फोटक वस्तूंच्या विक्रीची दुकाने लावणे सर्वस्वी धोक्याचे आहे.

नागरिकांची प्रशासनाकडे मागणी

महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार यांनी याप्रकरणी गांभीर्याने दखल घेतली असून पवार यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांचे शिष्टमंडळ नगरपालिकेचे मुख्याधिकारी रोडगे यांची भेट घेऊन शिवाजी चौकात फटाके स्टॉल लावण्यास परवानगी देऊ नये अशी मागणी केली आहे. त्याचप्रमाणे पोलीस निरीक्षक खोपडे यांची भेट घेऊन फटाके विक्रीचे स्टॉल लावताना योग्य ती खबरदारी प्रशासनाकडून घेण्याची विनंती केली आहे.

परतीच्या पावसाने भातपिकाचे नुकसान

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुका व परिसरात गेल्या तीन दिवसांपासून सायंकाळच्या सुमारास वारा व विजेच्या गडगडाटासह परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. यामुळे शेतात कापलेल्या भात पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.

सध्या विविध भागांतील भातशेती कापणीसाठी तयार झाली असून कापणीचा हंगाम जोरात सुरू झाला आहे. अनेक शेतकऱ्यांनी भात कापून शेतामध्ये ठेवले आहे. मात्र अचानक आलेल्या परतीच्या पावसाने कापलेल्या भात शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. कापलेले भात वाचवण्यासाठी शेतकरी राजाची धावपळ उडाली होती. परतीच्या पावसाने शेतकरी रडकुंडीला आले आहेत.

या पावसाने तालुक्यातील भात शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास या पावसाने हिरावून घेतला आहे. परतीचा पाऊस आणखी दोन ते तीन दिवसांत थांबला नाही तर कापलेले भातपीक खराब होऊन वर्षभराची कमाई पाण्यात जाण्याची चिन्हे असल्याची चिंता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

सव्वा लाखाची फसवणूक

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ गावातील एका व्यक्तीची ऑनलाईन व्यवहारात फसवणूक झाली आहे. सुरत येथून साड्या मागवण्याचा त्या व्यक्तीचा प्रयत्न त्यांच्या अंगलट आला. राजेंद्रगुरूनगर नेरळ येथे राहणारे राज राजू तांबे यांनी आपल्या मित्राच्या मोबाईलवरून श्रीजी इंटरप्रायजेस या कंपनीबरोबर यापूर्वी एकदा साडया खरेदी-विक्रीचे व्यवहार केला होता.आरोपीने फिर्यादी यांना अदयाप पर्यंत साडयांची ऑर्डर पाठविलेली नाही. याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोहवा/१२३३ पिंगळे हे करीत आहेत.

वर्षावास प्रवचन मालिका समाप्ती

। तळा । वार्ताहर ।

भारतीय बौध्द महासभा तालुका शाखा तळा यांचे माध्यमातून वर्षावास प्रवचन मालिका समाप्ती कार्यक्रम रविवार (दि. ०९) रोजी सुरेश साळवे यांचे घरी भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा तळा आणि तालुका बौद्धजन सेवा संस्था यांच्या विद्यमाने प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरचा कार्यक्रम महादेव जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या प्रसंगी प्रकाश गायकवाड, केशव लोखंडे, नागराज पवार यांनी मार्गदर्शन केले. तालुका शाखेला सहकार्य केल्याबद्दल सरचिटणीस प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी श्रामणेर विजय जाधव व अन्य तालुका पदाधिकारी उपस्थित होते. शेवटी सरणत्यय घेऊन प्रवचन मालिकेची सांगता करण्यात आली.

कर्जत येथे वर्षावास मालिकेची सांगता

। वेनगाव । वार्ताहर ।

भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने कर्जत तालुक्यात वर्षावास प्रवचन मालिका प्रचंड उत्साहात संपन्न झाली. बुद्ध विहारात तालुका अध्यक्ष कुणाल माने यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रमास विजय गायकवाड, विजय कांबळे अरुणा शिवशरण, राजेश भालेराव, कुणाल माने, भरत देसाई, राहूल गायकवाड, विकी जाधव, हिरा हिरे, मनिषा गायकवाड, वैशाली बोखारे, संतोष सोनावणे, सचिन वाशिकर, अमित गायकवाड, अनिकेत गायकवाड, मदन गायकवाड, समिर बनसोडे, संदिप धनवटे, सचिन आभंगे, नंदकुमार जाधव, कमलाकर जाधव प्रमोद वाघमारे, शुभम साळवी, उल्हास जाधव, दानदाते गणेश कांबळे, शरद गायकवाड, हरेश केदारी, धनदत्त देठे, ॲड. कैलास मोरे, राजपाल सोनावणे, अनिकेत गायकवाड, सुनील गायकवाड, धर्मेंद्र मोरे, प्रदीप ढोले, लोकेश यादव, निलेश पवार, हरेश गायकवाड, महेश आढाव, दर्शन जाधव, कृष्णा जाधव, विद्यानंद ओव्हाळ, आदी भारतीय बौद्धमहासभा, वंचित बहुजन आघाडीचै पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येत उपस्थित होते.

म्हसळा नगरपंचायतीचे राज्यात यश

। म्हसळा। वार्ताहर।

केंद्र सरकारचा स्वच्छ सर्वेक्षण २०२२ या उपक्रमात म्हसळा नगरपंचायतीने भाग घेऊन संपूर्ण राज्यात ३२ वा क्रमांक पटकाविला आहे. नगरपंचातीचे मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष असल कादिरी, उपनगराध्यक्ष संतोष शेडगे, सर्व नगरसेवक, आणि म्हसळा नगरपंचातीचे संपूर्ण प्रशासन यांनी शहरात नावीन्यपूर्ण संकल्पना राबऊन शहर जास्तीत जास्त स्वच्छ आणि सुंदर राखण्याचा प्रयत्न केला.

शासनाच्या निर्देशनुसार स्वच्छता, पर्यावरण रक्षण व संवर्धनाचे संदेश प्रसारित करणारी भित्तीपत्रके ठिकठिकाणी लावून पर्यावरण आणि स्वच्छतेचा प्रसार करण्यात आला. त्यानिमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी व खुल्या वर्गासाठी निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, सेफ्टी पॉईंट अशा प्रकारच्या विविध स्पर्धा घेऊन जनजागृती करण्यात आली. त्याचप्रमाणे गौरी गणपती सणाचे औचित्य साधून पर्यावरणपूरक देखावे करण्याचे आवाहन शहरातील नागरिकांना केले.

यामध्ये शहरातील पत्रकार उदय कळस, समीर दिवेकर, जागृती दिवेकर, सुशील दिवेकर या मंडळींनी बांबू आणि नारळाच्या झावळ्यांचा वापर करून पूर्णपणे पर्यावरणपूरक अतिशय सुंदर असा देखावा सादर केला. या देखाव्यास नगरपंचायत प्रशासनाने पाहणी करून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक दिले. त्याचप्रमाणे स्वराज संतोष उद्धकर (चित्रकला-प्रथम) मयूर महेंद्र ढवळे (प्रथम-सेल्फी) मेहजवस हमदानी (प्रथम-वेशभूषा) आराध्य शिर्के आणि इतर अनेक स्पर्धांचे बक्षीस समारंभ घेण्यात आले.

याबक्षीससमारंभासनगराध्यक्ष असल कादिरी, संतोष शेडगे, राखी करंबे, जंजिरकर, नसीर मिठागरे, माजी नगराध्यक्षा जयश्री कापरे, सुमैया कासीम अमदानी, सुशील यादव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी सर्व यशस्वी स्पर्धाकाना शुभेच्छा देऊन त्यांचे स्वागत केले. त्यांनी सांगितले कि अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शासनाचा हा अतिशय विधायक उपक्रम होता.

॥ विविध स्पर्धांचा बक्षीस समारंभ

॥ उदय कळस यांचा प्रथम क्रमांक

नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि सर्व सन्माननीय नगरसेवक तसेच आमचे सहकारी यांनी या उपक्रमात उत्तम सहकार्य केल्यामुळे राज्यात १०२ क्रमांकावर असणाऱ्या म्हसळा नगरपंचातीला ३२ व्या क्रमांकावर येता आले, आणि भविष्यात एक आकडी क्रमांकासाठी आमची पुढील वाटचाल असेल असे आश्वासनही मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी दिले. त्यासाठी प्रशासन आणि पदाधिकारी यांनी यापुढेही सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ अलिबागमधील किरणा होलसेल दुकानासाठी सेल्समन पाहिजे. ७४४७४८००००

■ डॉ.सरोज तांबोळी मेमोरियल हॉस्पिटल रामनाथ अलिबागमध्ये हॉस्पिटलच्या कामासाठी वॉड बॉय व मावश्या पाहिजेत मो.९३७२२०४९७०/९८२३०८०७०४

■ अलिबागमध्ये 1BHK फ्लॅट २४ लाखाला विकणे आहे. संपर्क-९२२६३१३०९०

■ पाहिजेतः नामांकित कंपनीसाठी वायरमन इलेक्ट्रीशियन, कॉम्प्युटर कॉपरेटर(टॅली) २ वर्षे अनुभव, त्वरीत पाहिजे. संपर्क-९४२२६९०८५३/८७८८२८६९९६ ठिकाण-अलिबाग, पाताळगंगा

■ N.A प्लॉट विकणे आहे. ठिकाणःसहाण; अलिबाग संपर्कः८०८७४७३९९९, ९२७०२३५९२४, ९७६५००५५७४

■ सर्वांना आवडेल असा 1BHK हवेशीर, उजेड भरपूर ६८५ SFTफ्लॅट (दोन दिवसांत पझेशन) विकणे आहे. संपर्कः ९६३७९२९९७३

■ पत्रकार मासिकासाठी वैयक्तिक मदतनीस पाहिजे. (पदवीधर)-संपर्क-९३२४९८७०५०

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

प्लास्टिकमुक्तीसाठी क्लॉथ व्हेंडिंगचा पर्याय

। पनवेल । वार्ताहर ।

प्लास्टिकच्या वापरामुळे पर्यावरणावर गंभीर स्वरुपाचे दुष्परिणाम होत आहेत. दैनंदिन जीवनात नागरिकांकडून प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याने कापडी पिशवी बनवणाऱ्या एक ऑटोमॅटिक क्लॉथ व्हेंडिंग मशिनची निर्मिती खारघरमधील सरस्वती अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रानिक आणि टेलिकम्युनिकेशन विभागाच्या विद्यार्थ्यांनी केली आहे.

पन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालण्यात आली आहे. असे असताना मार्केटमध्ये भाजीवाले, फळवाल्यांकडे, किराणा दुकानात या पिशव्यांचा सर्रास वापर होताना दिसत आहे. त्यामुळे प्लास्टिकच्या पिशव्यांमुळे होणारी पर्यावरणाची हानी थांबवण्यासाठी सरस्वती अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कापडी पिशवी निर्मितीची मशीन विकसित केली आहे. सरस्वती अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रानिक आणि टेलिकम्युनिकेशन शाखेच्या प्रमुख शीतल बुक्कावार आणि प्राचार्य मंजुषा देशमुख यांच्या प्रोत्साहनातून आठ विद्यार्थ्यांच्या मदतीने या स्वयंचलित व्हेंडिंग मशिनची निर्मिती केली आहे.

> क्लॉथ व्हेंडिंग मशिनच्या निर्मितीसाठी विद्यार्थ्यांची मेहनत, प्राचार्या मंजुषा देशमुख यांचे मार्गदर्शन आणि खारघर तळोजा कॉलनीज वेल्फेअर असोसिएशनचे सहकार्य खूप मोलाचे आहे.
> -शीतल बुक्कावार, सरस्वती अभियांत्रिकी महाविद्यालय

राज्यातील पहिलेच मशीन

निर्मिती केलेली मशीन हलकी असून तीन फूट एवढी आहे. या मशीनमध्ये दहा रुपये किंवा पाच रुपयांचे दोन नाणी टाकल्यास मशीनमधून एक कापडी पिशवी बाहेर येते. या प्रकल्पाला खारघर तळोजा कॉलनीज वेल्फेअर असोसिएशनने आर्थिक सहाय्य दिले असून राज्यातील हे पहिले स्वयंचलित व्हेंडिंग मशीन असल्याचा दावा केला जात आहे.

विवाहित बेपत्ता

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील कानपोली गावात राहणारी विवाहिता कोणास काही एक न सांगता घरातुन निघुन गेल्याने या बाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे. दपीका महेंद्र पालकर (वय २३ वर्षे) असे या महिलेचे नाव असून सदर महिलेची उंची ४.९ इंच, चेहरा गोल, नाक सरळ केस काळे व लांब, रंग गोरा, बांधा मजबुत, अंगात नेसुन गुलाबी रंगाचा टॉप, उजव्या हातावर च-क्ष्छ असे गोंदलेले, गळयात साधे मंगळसुत्र आहे. तरी या महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२४४४ किंवा पोना नितीन डगळे यांच्याशी संपर्क साधावा.

स्मार्ट प्रकल्पामध्ये सहभागी होण्याचे आवाहन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्यांची व शेतकरी गटाची सभा नुकतीच अलिबाग येथे पार पडली. यावेळी जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) प्रमुख तथा प्रकल्प संचालक आत्मा व जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले, स्मार्ट प्रकल्पाचे विभागीय नोडल अधिकारी रामेश्वर पाचे, जिल्हा नोडल अधिकारी तथा प्रकल्प उपसंचालक आत्मा श्री.सतिश बोऱ्हाडे आणि पुरवठा व मूल्य साखळी विकास तज्ज्ञ भाऊसाहेब गावडे तसेच तालुक्याचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचे अध्यक्ष/प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बाणखेले यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींना स्मार्ट योजनेचे महत्व पटवून सांगितले. राज्य शासन जागतिक बँकेच्या माध्यमातून ६० टक्के अनुदान देत असून आपण स्मार्ट प्रकल्पामध्ये सहभागी होऊन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

पाचे यांनी शेतकरी कंपन्यांना प्रस्ताव तयार करण्यामध्ये असलेल्या अडचणी जाणून घेतल्या. त्यामध्ये सभासद संख्या व वार्षिक उलाढाल या अटी शिथिल करण्यात याव्यात, अशी मागणी कंपनी प्रतिनिधींनी मांडली. याविषयी बोलताना जिल्हास्तरावरुन अटी व शर्ती शिथिल करण्याविषयी प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल, असे श्रीमती बाणखेले यांनी सांगितले.

बोऱ्हाडे यांनी जिल्ह्यासाठी केवळ १५ शेतकरी उत्पादक कंपन्यांचा लक्षांक असल्यामुळे लवकरात लवकर प्रस्ताव प्राथमिक मंजुरीसाठी सादर करावेत व आवश्यक असणारी कागदपत्रे, शेतकरी उत्पादक कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र, लेखापरिक्षण अहवाल, सभासदांची यादी व खरेदीदारासोबतचा करार इत्यादी कागदपत्रे सादर करण्याविषयी आवाहन केले.

मूल्य साखळी विकास तज्ज्ञ भाऊसाहेब गावडे यांनी प्रस्ताव सादर करीत असताना दुग्धव्यवसाय आधारित, कुक्कुटपालन आधारित, शेळीपालन आधारित किंवा मत्स्यव्यवसाय आधारित प्रकल्प वगळता इतर जास्तीत दोन किंवा तीन धान्य पिके किंवा फळवर्गीय पिकाची मूल्यसाखळी विकसित करण्याच्या दृष्टीने प्रक्रियेसंदर्भातील किंवा ग्रेडींग पॅकिंग व विक्री किंवा ग्रेडींग पॅकिंग निर्यातसंबंधी प्रस्ताव कंपन्यांनी सादर करावेत, असे सांगितले. कार्यक्रमाच्याशेवटीसतिशबोऱ्हाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. स्मार्ट प्रकल्पाविषयी अधिक माहितीसाठी ९३५९३९९३८३/ ९९६७८३८१०४ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहनही कृषी विभागाकडून करण्यात आले.

जाहीर सूचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे तलवडे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नं. ९३ मधिल मौजे जलपाडा येथिल ग्रुप ग्रामपंचायत घर क्र. १३६ व घर क्र. १३९ ह्या घर मिळकती, श्री. राजेंद्र दत्तात्रेय पाटील यांच्या मालकीच्या असून, सदरील घर मिळकती, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १०/१०/२०२२.

सही/
(ॲड.संजय म.भगत)
हिराबाग सोसायटी,
ए विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदाराचे वकील

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णनः तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतजमिन.

मौजे चाणजे, ता.उरण जि.रायगड

सर्व्हे नं.	शेतकऱ्यांचे नाव	एकूण क्षेत्र.हे.आर	आकार रु.पैसे
३५४/२/ब	कै.कानू बाळकृष्ण ठाकूर यांचे वारस १.श्री.भालचंद्र कानु ठाकूर (मुलगा) २.श्रीमती. निरा प्रमोद मढवी (मुलगी) ३.श्रीमती कुसुम मनोहर पाटील (मुलगी) ४.श्रीमती जना कानु ठाकूर (मुलगी)	०.१६.५	३.२५

वर नमुद केलेली मिळकत कै. कानु बाळकृष्ण ठाकूर यांचे नावे आहे. त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर असलेले वारस १.श्री.भालचंद्र कानु ठाकूर(मुलगा)२.श्रीमती. निरा प्रमोद मढवी (मुलगी)३.श्रीमती कुसुम मनोहर पाटील (मुलगी)४.श्रीमती जना कानु ठाकूर (मुलगी) हे वरील मिळकत कबजे वहिवाटीत आहे. तसेच कै.कानु बाळकृष्ण ठाकुर यांचे वारस नोंद करणे कामी महसूल दप्तरी वारस अर्ज व प्रतिज्ञापत्र दाखल केलेला आहे. त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विद्यमान वारसांनी सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनचिठ्ठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसीत करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपंत्राकित दान, जप्ती, कर्ज, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाणःउरण
दिनांकः११/१०/२०२२
सही/-
ॲड.उमेश लक्ष्मण शिंदे
ऑफिस पत्ताः शॉप नं.९०५-९०८, शेल्टॉन क्युँबीक्स, प्लॉट नं.८७, सेक्टर१५
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
मो.९८२०६२६९००,ऑफिस फोन नं.०२२४९७०९७८९

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

उप प्रादेशिक कार्यालय, तळोजा,

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी रद्द करण्याबाबत सूचना

वने, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय,भारत सरकार यांची अधिसूचना दि.१४.०९.२००६ अन्वये मे.हिंदाल्को इंडस्ट्रीज लिमिटेड, प्लॉट नंबर २, म. औ. वि. म. तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या कोटिंग लाइन, कास्ट हाऊस, कोल्ड रोलिंग मिल आणि संबंधित यंत्र सामग्री उभारून उत्पादन क्षमता वाढवण्याकरीता पर्यावरण विषयक जनसुनावणीचा अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाला होता, त्या अनुषंगाने दिनांक १३/१०/२०२२ रोजी तळोज मॅनुफॅक्चुरीन्ग असोसिएशन हॉल, प्लॉट नंबर- २१, म. औ. वि. म. तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड. पिनकोड- ४१०२०८ येथे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करण्यात आली होती परंतु, उद्योगाने कळविण्याप्रमाणे व मा.जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांच्याकडील दि. ०७/१०/२०२२ रोजीच्या पत्रानुसार अपरिहार्य कारणामुळे सदर पर्यावरण विषयक जनसुनावणी रद्द करण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तळोजा

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल दर्श ग्रीन ग्रोथ एल.एल.पी.तर्फे भागीदार १.दर्श संजय जैन, २.राजेश बिजयराज भंडारी, ३.श्रीम. सुशिला संजय जैन यांनी मौजे तांबडीवाडी, ता.रोहा, जि.रायगड येथील जुना गट क्र.२२३/१, नविन गट क्र.५४/१ क्षेत्र ८.४१.० हे.आर.पैकी ०.७७.० हे.आर. ही जमीन दिनांक १३/०६/२०२२ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताने श्री.आकाश अशोक धोत्रे यांना विकत दिलेली आहे. सदरील मिळकतीच्या चर्तुसिमा खरेदीखतामध्ये नमुद केलेल्या आहेत. तसेच सदरची मिळकत ही महसुल दप्तरी ७/१२ रोजीच्या उताऱ्यावर श्री.आकाश अशोक धोत्रे यांचे नावे झालेली आहे. सदरील मिळकतीच्या पश्चिमेस व उत्तरेस गट क्र.२३० ही मिळकत आहे.

अशी परिस्थिती असताना श्री.आकाश अशोक धोत्रे यांनी गट क्र.२३० च्या मिळकतीस सिमेंटचे पोल मारून कंपाऊंडचे काम सुरु केलेले आहे. वास्तविकतः गट नं.२३० या मिळकतीशी श्री.आकाश अशोक धोत्रे यांचा कोणताही संबंध नाही. आमचे अशिल या जाहीर नोटीसीने असे सुचित करतात की, सदरचे सिमेंट कंपाऊंडचे काम करण्यापुर्वी श्री.आकाश अशोक धोत्रे यांनी खरेदीखतातील चुर्तसिमापुर्वक जागेची उपअधिक्षक भुमि अभिलेख रोहा यांचेकडून मोजणी घ्यावी. तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, श्री.आकाश अशोक धोत्रे यांनी गट नं.२३० या मिळकतीत कोणतेही कंपाऊंडचे अगर कोणतेही बांधकाम करू नये. तसेच केलेले अतिक्रमित सिमेंटचे पोल स्वतःहुन काढून टाकावेत.

पालीः
दिनांकः१०/१०/२०२२

सही/-
ॲड.सुभाष गोपिनाथ पाटील
(बी.कॉम.एलएल.बी.)
ओसवाल प्लाझा बिल्डींग नं.८, तळमजला
गाळा नं.१ मु.पो.पाली, ता.सुधागड जि.रायगड
मोबा.नं.९४२०६४८९७५/८००७०९०६४०
ऑफिस नं. ०२१४२-२४२८२०

जनतेस आवाहन

अलिबाग व रायगड रहिवासी यांना कळविण्यात येते की काही महिन्यांपासून अलिबाग व रायगड येथे कॉलगर्ल्स व वेश्याव्यवसाय ऑनलाईन स्वरूपात होत असून त्यात मानसिक व आर्थिक नुकसान गुन्हेगांराकडून होत आहेत.

आशांनी संपर्क साधावा. श्री.प्रसाद पवार, गुन्हे पत्रकार व अध्यक्ष, रायगड, हुमन फाऊंडेशन, NGO, मुंबई- ९३२४९८७०५०

महाराष्ट्र शासन
(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)
मार्ग प्रकल्प विभाग, महाड
जिल्हा रायगड ४०२३०१
Email :-rpdmahad.ee@mahapwd.com Ph. No. 20145 222243.
NOTICE INVITING e-TENDER
Notice No. 03 for 2022-23

कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक), मार्ग प्रकल्प विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या कंत्राटदारांकडुन बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड रायगड किल्ला सेल, मार्ग प्रकल्प विभाग, महाड, यांनी राखून ठेवला आहे.

ई निविदा काम क्रमांक	कामाचे नाव	कामाची अंदाजित किंमत	इसारा / बयाणा रक्कम	काम पूर्ण करण्याचा कालावधी	ई-निविदा संचाची किंमत	नोंदणी वर्ग
१.	२	३	४	५	६	७
१	किल्ले रायगड येथे नाणे दरवाजा पदपथाच्या समोरील बाजुस रायगड छत्री निजामपुर रस्त्यावर दगडी भिंत बांधणे तालुका महाड जि. रायगड	१,७८,०७,११४/-	१,५०,०००.००	१५ महिने	११८०.००	आवश्यक्ता नाही
२	मोजे पाचाड येथे हेलिपॅडचे बांधकाम करणे तालुका महाड, जि. रायगड.	२,१३,१४.६६०/-	१,५०,०००.००	१५ महिने	२३६०.००	आवश्यक्ता नाही

ई निविदेचे वेळापत्रक

१	निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ	दि. ११/१०/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दि. ०७/११/२०२२ (१८.००) वाजेपर्यंत
२	मा. अधीक्षक अभियंता, रायगड (सा. बां.) मंडळ, कोकण भवन यांचे कार्यालयात निवीदापुर्व बैठक	दिनांक २०/१०/२०२२ सकाळी ११.००
३	ऑनलाईनव्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास)	कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक), मार्ग प्रकल्प विभाग महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. ११/११/२०२२ वेळ ११.०० पासुन

टिपः
● परिपर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईल निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

रा.कि.सेल/माप्रवि/महाड/निविदा/३४७
दिनांक : ०७.१०.२०२२

सही-
(महेश रा. नामदे)
कार्यकारी अभियंता
(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)
मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे, बांधिवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकतीबाबत आमचे अशिल श्री.मंगेश लक्ष्मण बोराडे यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मौजे-बांधिवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत

मालकाचे नाव	स.नं./ प्लॉट नं	क्षेत्र हे.आर.चौ.मीटर	आकार
१.सुशिल बद्रीप्रसाद शर्मा २.मंगेश अप्पा जंगम, ३.अंजली मिलिंद मुखेडकर उर्फे अंजली अप्पा जंगम	१३६/१७	३०० चौ.मीटर	३०

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, वारसाहक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, कोर्ट कचेरी अथवा कोणत्याही स्वरूपात कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७(सात) दिवसांचे आत खालील सही करणार यांच्या पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यानी तो सोडून दिला आहे. असे समजून सदरील बिनशेती मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वास कळावे.

दिनांक :११/१०/२०२२
ठिकाणःकर्जत
पत्ताः लक्ष्मी अपार्टमेंट सदनिका क्रं.१०८
पहिला मजला, शेलु स्टेशन जवळ (पु.)बांधिवली,
ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं.९९२२१५५१५३

सही/-
ॲड.सूर्यकांत भाऊ मसणे,

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आहे की, आमचे अशिल यानी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे विद्यमान मालक १) श्री.शिवाजी कृष्णा म्हसे, यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

मौजे-वारे, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जमिन मिळकत.

सर्वे नं	हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
९१	३२	०.३०.०० पो.ख.०.०७.००	०.१६
१००	६	१.१८.०० पो.ख.०.२६.००	०.५९
९१	३१/ब/१	१.७९.०० पो.ख.०.४७.००	१.००

सदर जमिन मिळकत ही वरील मालकाची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्याना हक्क अधिकारी असल्याने त्यानी सदरील मिळकत ही तदंगभुत हक्क व हितसंबंधासह आमचे अशिलाना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लीन, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यानी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकार बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि.११/१०/२०२२

सही/-
खरेदीदारातर्फे वकील
ॲड.अश्विनी लक्ष्मण लोहकरे
पत्ता-मिडास वॅली, 'बी' विंग, दुसरा मजला, रूम नं.२०७, सोनार आळी, दहिवली, ता.कर्जत जि.रायगड, पिन. ४१०२०१, मो.नं. ९०६७१०६९९९/९७६७४२९२६३.

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ. क्र.	गाव व संचिका क्र.	निवाडा क्र.	सर्व्हे क्र.	संपादित क्षेत्र (हे. आर.)	मंजूर पात्रता (चौ.मी.)	वाटपपत्र/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	भूखंडाच्या वाटपाशी/करारनाम्याशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी /करारनाम्याशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती
१	रोडपाली १३१	२६ रोडपाली	१६९/०	०-३१-१ पैकी ०-१८-४	२५० चौ.मी. पैकी १५०.०० चौ.मी.	मौजे कळंबोली नोड, भूखंड क्र.४२A, सेक्टर-१०E, क्षेत्र १४९.९४ चौ.मी.	**मूळ भूधारक मारूती आंबो भोईर (मयत) यांचे वारस** १) श्री. बंडू मारूती भोईर २) श्री. बाळू मारूती भोईर **३) कै. काळुराम मारूती भोईर (मयत) यांचे वारस** ३.१) श्रीमती सुभद्रा काळुराम भोईर ३.२) श्री. प्रल्हाद काळुराम भोईर ३.३) श्री. जोमा काळुराम भोईर ३.४) श्रीमती विमल अभिमन्यू पाटील	रे.मु.क्र.२३५/२०१९ या दाव्यातील सद्यस्थिती अहवालानुसार दाव्यात महामंडळाविरुद्ध Status Quo "जैसे थे" किंवा प्रतिबंधात्मक आदेश पारित नाहीत.
२	उलवे २०११	१९९	६०/५	०-१२-०	एकूण मंजूर १०० चौ.मी. प्रस्तावित	मौजे उलवे येथे भूखंड क्र.२१२A, सेक्टर-१९, क्षेत्र- ९७.५६ चौ.मी.	**कै. रामचंद्र राघोबा चव्हाण व कै. विश्वनाथ रामचंद्र चव्हाण (मयत) यांचे वारस** श्री. विनायक विश्वनाथ चव्हाण	निरंक

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी
(पनवेल)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२७३/२०२२-२३

अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि.रायगड

क्रमांक/आरटीएस/अपील क्र.१९६/२०२१.

१.श्री.जयराम गणपत पानसे
रा.वाजे, गणेश मंदिराजवळ, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
हिरू गणपत पानसे मयत तर्फे वारस
२ श्रीम.पुष्पा रमेश शिंदे
३ श्रीम.अरूणा यशवंत गोडीवले
४ श्रीम.करूणा उर्फ सुवर्णा मेघनाथ गोठल — अपिलार्थी
रा.आकुळवाडी पो.गुळसुंदे, ता.पनवेल, जि.रायगड
परशुराम गणपत पानसे मयत तर्फे वारस
५ श्रीम.उर्मिला परशुराम पानसे
६ श्री.निलेश परशुराम पानसे
७ श्री.नरेश परशुराम पानसे
अ.क्र.२,३,५,६ व ७ रा. कराडे, बु.पो.गुळसुंदे ता.पनवेल, जि.रायगड

विरूध्द

शंकर गणपत पानसे मयत तर्फे वारस
१ श्रीम.पार्वती शंकर पानसे
रा.वाजे, गणेश मंदिराजवळ, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
२.श्रीम.मंदा राम मालप रा.कासप,पो.आपटा, ता.पनवेल, जि.रायगड
३ श्रीम.कुंदा बबन सावंत — उत्तरार्थी
रा.काळणाची वाडी, पो.मोहोपाडा, ता.खालापूर जि.रायगड
४ श्री.नंदु सुरेश गोडीवले, रा.कराडे बु.पो.गुळसुंदे, ता.पनवेल जि.रायगड
५ श्रीम.वनिता राजू पवार- रा.काळा तलावाजवळ कल्याण, जि.ठाणे
६ श्रीम.सुनिता वसंत कार्लेकर, रा.लाडीवली, पो.गुळसुंदे, ता.पनवेल,जि.रायगड
७ श्रीम.गुलाब तुकाराम पाटील, मु.नेरे,बँक ऑफ इंडियाजवळ, ता.पनवेल जि.रायगड

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे वाजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं.१६/१ क्षेत्र ०-५५-०० आकार ०.९४, सर्व्हे नं १६/२ क्षेत्र ०-४३-१० आकार ७.३० सर्व्हे नं.१९९ क्षेत्र ०-३६-२० आकार ६.९४ या जमिन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि.२६/०७/२०२१ रोजी अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि.१७/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपीलाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाणःअलिबाग
दिनांक : ०३/१०/२०२२

सही/-
अपर जिल्हाधिकारी रायगड
अलिबाग करीता

खोपोली नगरपरिषद

KMC
खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड, पीन कोड नं. ४१० २०३
फोन नं.(०२१९२)२६२२२२, २६३३५६, २६४२११,
Email ID :- cokmckhopoli@gmail.com

जा.क्र.केएमसी/आरोग्य/२२८० — दिनांक :- १०/१०/२०२२

खोपोली नगरपरिषद

जाहीर आवाहन

खोपोली शहर हद्दीतील सर्व फटाके विक्री करणारे व्यावसायिक व फटाके वापर करणारे नागरीकांना आहवान करण्यात येते की, भारत सरकार, अधिसूचना क्रमांक G.S.R.682 (E), dt ५,१०, १९९९ अन्वये १२५ dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे.

अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरियम सॉल्ट, लिथीयम, आर्सेनिक, लीड, मक्युरी, यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकामुळे विषारी वायु तयार होतात हे वायू प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच जनहित याचिका क्र.१५२/२०१५ मध्ये मा.ना उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम १८८४ आणि त्या अंतर्गत केलेले विस्फोटक नियम २००८ मधील प्रतिबंध व नियम यांची अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटके विक्री करणेची नाही. तसेच परवानगी असलेले फटाके नगरपरिषदेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच विक्री करणेची आहे.

महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा अभियान २.० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२२ अभियानांतर्गत फटाके कमुक्त, प्लॉस्टिकमुक्त, कचरामुक्त, प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टिवल, सण-उत्सव साजरे करण्याचा प्रयत्न करू सदर अभियानांतर्गत नागरीकांनी फटाक्याचा वापर टाळा. प्लॅस्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करा. सण समारंभामध्ये टाकावू वस्तूंचा व पुनर्वापर करण्यायोग्य वस्तूंचा वापर जास्तीतजास्त करावा. पर्यावरणपूरक, प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी.

तरी येणारी दिवाळी हरित व पर्यावरणपूरक दिवाळी म्हणून साजरी करूया. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो, अशा सर्वांना दिप

महत्त्वाचे

दिवाळीनिमित्त गडकिल्ले स्पर्धा

। उरण । वार्ताहर ।

छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकलेले गडकिल्ले व त्या गडकिल्ल्यांचे संरक्षण, संवर्धन व्हावे तसेच लहान बालकांना महाराष्ट्रातील शोर्य, पराक्रमी इतिहासाची ओळख व्हावी, बालकांना गडकिल्ल्यांविषयी आवड निर्माण व्हावी या दृष्टीकोनातून दरवर्षी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दिवाळी सणाचे औचित्य साधून गडकिल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. याहीवर्षी गडकिल्ले व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दोन्ही स्पर्धा या उरण तालुका मर्यादित आहेत. अधिक माहितीसाठी संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील ८०९७१ ०००७३, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे ९७०२७५१०९८ यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

तरुण बेपत्ता

। पनवेल । वार्ताहर ।

कोणास काही एक न सांगता एक तरुण कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार सीबीडी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.अजय गौतम धुरंधर (२३ रा.टाटानगर, झोपडपट्टी सीबीडी), केस काळे कुरळे, रंग सावळा, भुवया मोठ्या, डोळे काळे, नाक सरळ, दाढी मिशी बारीक, उंची ५ फुट ४ इंच असून अंगात निळ्या रंगाची हाफ पॅन्ट आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास सीबीडी पोलीस ठाणे फोन नं.०२२-२७५८०२५५ किंवा पो.ना.मंगेश पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

मार्गदर्शन शिबीर

। पनवेल । वार्ताहर ।

मराठा उद्योजक सारथी या संघटनेतर्फे अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ माध्यामातून मराठा समाजातील उद्योजक / व्यावसायिकांना उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या व्यावसायिक कर्ज परतावा योजने अंतर्गत विनातारण व्यावसायिक कर्ज मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले. हे शिबीर शनिवार (८) रोजी उत्कर्ष सभागृह, खारघर, नवी मुंबई येथे संपन्न झाले. या शिबिरात नॅशनल को. ऑ. बँकचे सह-महव्यवस्थापक बाळासाहेब पवार आणि त्यांची टीम उपस्थित होती.

महामार्गावर चिखलाचे साम्राज्य

वाहतुकीवर परिणाम, प्रवाशांचे हाल

। सुकेळी । वार्ताहर ।

दोन ते तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. या पावसामुळे मुंबई-गोवा महामार्गावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य पसरल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्यामुळे वाहतूक अत्यंत धिम्या गतीने सुरू असून काही ठिकाणी वाहतूककोंडी झाली होती.

मुंबई-गोवा महामार्ग म्हटला की, दरवर्षी पावसाळा सुरू झाला की वाहनचालकांना तसेच प्रवाशी वर्गाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच महामार्गावर जे मोठ-मोठे खड्डे पडलेले होते त्या खड्ड्यांमधे संबंधित ठेकेदाराकडून दगड व माती वापरुन हे खड्डे भरुन वाहनचालकांच्या जीवाशी खेळ खेळला आहे. सध्या दोन ते तीन दिवस सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे हे दगड-गोठे रस्त्यावर आजुबाजुला पसरलेले आहेत. त्याचप्रमाणे चिखलाचे देखिल मोठ्या प्रमाणात साम्राज्य पसरले आहे. यामधुन वाट काढताना वाहनचालकांची अक्षरशः दमछाक होत आहे.

त्यामुळे या महामार्गाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर योग्य ती कारवाई करावी व महामार्गाचे काम लवकरात लवकर पुर्ण करावे अशी मागणी वाहनचालकातुन व प्रवाशातुन होत आहे.

शिंपी समाजातर्फे विजेत्यांचा गौरव

। तळे । वार्ताहर ।

श्री देव राधाकृष्ण नामदेव शिंपी समाज संस्था गेली अनेक वर्ष सामाजिक धार्मिक शैक्षणिक सांस्कृतिक अशा विविध कार्यक्रमातून समाजप्रबोधनाचे कार्य करीत आहे. या संस्थेचा श्रीकृष्ण जन्मोत्सव हा महत्त्वाचा उपक्रम असून या काळात ललिताच्या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रम प्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. त्याचा बक्षीस समारंभ संस्थेचे अध्यक्ष महेंद्र कजबजे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

याप्रसंगी संस्थेची विश्वस्त रवींद्र वाईकर, प्रकाश दलाल, पुरुषोत्तम मुळे, सतीश मुद्राळे, प्रमोद मेकडे, जानकी कजबजे, पुजा मेकडे, नेहा पांढरकामे, चंद्रकांत रोडे, प्रकाश मेकडे, नमित पांढरकामे, श्रीराम कजबजे, किरण मेकडे, विवेक कजबजे, ओमकार कजबजे, केतन लिमकर, श्रेयस रोडे, शुभम बारटक्के, प्रसाद बारटक्के, सागर मुद्राळे, ऋषिकेश बारटक्के, निशांत मुद्राळे व महिलावर्ग उपस्थित होता. याप्रसंगी श्रीराम कजबजे, पुरुषोत्तम मुळे, जान्हवी कजबजे, चंद्रकांत रोडे, महेंद्र कजबजे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार प्रदर्शन मितेश मुळे यांनी केले.

डायरेक्ट व्हॉलीबॉल प्रमोशन असोसिएशनची स्थापना

समीर म्हात्रे यांची अध्यक्षपदी निवड

। पेण । प्रतिनिधी ।

डायरेक्ट व्हॉलीबॉल प्रमोशन असोसिएशनची पेण तालुक्यात देखील स्थापना करण्यात आली. या कार्यकरणीत सामाजिक कार्यकर्ते समीर म्हात्रे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी व्हॉलीबॉल हा खेळ तालुक्यातील प्रत्येक गावागावात पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहीन अशी ग्वाही म्हात्रे यांनी दिली.

व्हॉलीबॉल हा पारंपारिक खेळ देखील देशासह अंतरराष्ट्रीय स्तरावर पोहाचवा यासाठी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करत असणारी डायरेक्ट व्हॉलीबॉल असोसिएशन ही संघटना प्रयत्न करत आहे. या असोसिएशनला २६ देश सलग्न असून राज्यात २६ जिल्हे सहभागी झाले आहेत. कर्जत, खालापूर, उरण, पनवेल, अलिबाग, पाली-सुधागड आदी ठिकाणी या असोसिएशनची स्थापना करण्यात आली असून सोमवार (१०) रोजी पेण येथे देखील स्थापना करण्यात आली.

जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे यांची कार्याध्यक्ष, रमेश म्हात्रे उपाध्यक्ष, नरेंद्र पाटील उपाध्यक्ष, हिरामण भोईर जनरल सेक्रेटरी, रुपेश कदम सहसेक्रेटरी, नितिन वर्तक खजिनदार, सुभाष पाटील सहखजिनदार, निखिल पाटील, विलास पाटील हे सदस्य गजानन पाटील पंच कमिटी अध्यक्ष, नरेन्द्र पाटील पंच कमिटी सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली. यावेळी प्रसिद्धी प्रमुख म्हणून संतोष पाटील, स्वप्नील पाटील यांची निवड करण्यात आली.

पात्र फेरीवाल्यांची यादी प्रसिद्ध

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल पालिका अंतर्गत फेरीवाल्यांना सहाय्य या घटकाचे काम पहिले जाते. या घटकांतर्गत करण्यात सर्वेक्षणात आलेल्या फेरीवाला पात्र ठरलेल्या फेरीवाल्यांची यादी पालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. पालिका क्षेत्रातील विविध भागात मोठ्या प्रमाणात फेरीवाले व्यवसाय करीत आहेत. फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी पालिका प्रशासनावर येऊन पडली आहे.

फेरीवाल्यांची ही समस्या सोडवण्यासाठी व सिडकोने फेरीवाल्यांकरिता राखीव ठेवलेल्या भूखंडावर त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी पालिकेच्यावतीने फेरीवाला समिती स्थापन करण्यात आली असून, पालिका हद्दीतीलफेरीवाल्यांच्या सर्वेक्षणाला सुरुवात करण्यात आली आहे.

या सर्वेक्षणान आखून दिलेल्या निकषावर पात्र ठरलेल्या फेरीवाल्यांची यादी पालिकेच्या संकेतस्थळावर २३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध झाली आहे. पालिकेने या यादीवर हरकती आणि सूचना मांडण्यासाठी २५ ऑक्टोबर पर्यंत कालावधी देण्यात आल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली आहे.

जवळपास ५५ भूखंडांचे हस्तांतरण पालिकेकडे झाले आहे तर काही भूखंडांचे हस्तांतरण पालिकेकडे होणे बाकी आहे. पालिकेकडे हस्तांतरित झालेल्या भूखंडावर फेरीवाला धोरणा नुसार पात्र फेरीवल्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

जॉगिंग ट्रॅकवर सुकलेल्या पानांचे ढिगारे

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये नवी मुंबई देशातील तृतीय क्रमांकाचे सर्वात स्वच्छ शहर म्हणून गौरविण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यात नवी मुंबई नेहमीप्रमाणेच नंबर वन कचरामुक्त शहराचे फाईव्ह स्टार मानांकन मिळविणारे शहर असून नवी मुंबई महानगर पालिकेला सातत्याने गौरवण्यात येत आहे. परंतु अजूनही शहरा-तील नागरिकांसाठी बनवण्यात आलेले जॉगिंग ट्रॅक तसेच विविध भागात असलेले हरित पट्टे या ठिकाणी पाणगळीमुळे सुकलेल्या पानांचे ढीग करून ठेवले जातात ते दिवसेंदिवस उचलले जात नसल्याने नागरिकांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

घनकचरा विभागाने योग्य ती खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे. नव्याने २०२३ स्वच्छ सर्वेक्षणाची सुरवात झाली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा स्वच्छ सर्वेक्षणासाठी स्वच्छता मोहीम सुरू झालेली असताना घनकचरा व्यवस्थापन विभागाने स्वच्छतेबाबत आणखी बारकाईने लक्ष देण्याची मागणी नागरिक करू लागली आहेत. नवी मुंबई शहरामध्ये बेलापूर ते दिघा या आठ विभाग कार्यालयांतर्गत अनेक उद्याने हरित पट्टे व जॉगिंग ट्रॅक यांची निर्मिती करण्यात आलेली आहे. परंतु काही भागांमध्ये सुक्या पानांचे हे ढिगारे उद्यानांमध्ये व जॉगिंग ट्रॅकवर अनेक दिवस पडून असतात त्यामुळे या ठिकाणी जाणार जाणाऱ्या नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

पशुसंवर्धन विभागामार्फत लसीकरण

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यात येणाऱ्या गाव आणि वाड्या वस्त्यांवरील गोवर्ग जनावरांना पशु विभागामार्फत लसीकरण करण्यात येत आहे. दरम्यान तालुक्यात झालेल्या संरक्षणात अजून तरी एकही लम्पी चर्मरोगाने बाधित जनावरे आढळून आली नाहीत. तरीही खबरदारीची उपाययोजना म्हणून मोठ्या संख्येने जनावरे असलेल्या गावात पशुसंवर्धन विभागाकडून लसीकरण मोहीम सुरू केली असल्याचे, पशुधन विकास अधिकारी डॉ. अनिल धांडे यांनी स्पष्ट केले आहे. तालुक्यात सद्यस्थितीत शासनाकडून मिळालेल्या लसी पैकी मार्गदर्शक सूचनेनुसार जवळजवळ शंभर टक्के लसीकरण पूर्ण झाले आहे.

यात रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या गोवर्ग जनावरांनाही लम्पी चर्म रोगाची लस देण्यात आली आहे. दरम्यान तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या माध्यमातून,डॉ. रासडी डाबेराव यांनी चिरनेर परिसरातील ११६१ गोवर्ग जनावरांचे लसीकरण केले. डॉ. महेश शिंदे यांनी विंधणे परिसरात २९७ गोवर्ग जनावरांना लम्पी चर्म रोगाची लस दिली. तर जासई येथील डॉ. महेश सावंत यांनी ५४२ गुरांचे लसीकरण केले. उरणमध्ये डॉ. सोमनाथ भोडान यांनी ९५४ गोवर्ग जनावरांचे लसीकरण केले आहे. तालुक्यात एकूण २९५४ गोवर्ग जनावरांना त्यांच्या संरक्षणासाठी लम्पी चर्मरोगाच्या आजाराची लस देण्यात आली आहे.

वेशभूषा स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

। अलिबाग । वार्ताहर ।

नवरात्रोत्सवानिमित्त नवतरुण नवरात्र उत्सव मंडळ, नागाव-कवळे पारोडा येथे मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, मधुमेह तपासणीचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम लायन्स क्लब नागाव व अलिबाग यांच्या सौजन्याने पार पाडला. या शिबिराचा लाभ एकशे सात जणांनी लाभ घेतला. दरम्यान, मंडळाकडून घेण्यात आलेले वेशभूषा स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले

या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करुन मोफत औषध देण्यात आले. या कार्यक्रमास महेश मोघे, रवींद्र घरत, नागाव ग्रामपंचायतीचे सरपंच निखिल मयेकर, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, सदस्या हर्षदा मयेकर, सुरेंद्र नागलेकर, मेजर रानडे, डॉ. कुडतरकर आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेंद्र नागलेकर यांनी केले.

दरम्यान, मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वेशभूषा स्पर्धेत मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तपासणी शिबीर

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील गरजू नेत्र रुग्णांकरिता पनवेल येथील झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्यातर्फे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तपासणी शिबिराचे रविवारी (दि.९) डॉ. दाभाडकर रुग्णालयाच्या प्रांगणामध्ये शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. अश्विनी पाटील व डॉ. संदेश रसाळ यांनी रुग्णांची तपासणी केली.

यावेळी सुनील अग्रवाल यांनी शिबिराला सर्व प्रकारचे सहकार्य केले. महाड आणि पोलादपूर दोन्ही तालुके मोतीबिंदूमुक्त करण्याचा प्रयत्न असल्याचे अग्रवाल यांनी यावेळी सांगितले. शिबीर यशस्वी करण्यासाठी शिबिराचे प्रदीप शिलीमकर, दीपक गायकवाड तुळशीदास भोसले, शेतकरी कामगार सेवाभावी संस्था आधार सामाजिक सेवा संस्था यांच्या कार्यकर्त्यांकडून मोलाचे सहकार्य लाभले.

सुरगड व मानगड किल्ले सजले

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

आधी तोरण गडाला मग माझ्या घराला या संकल्पनेतून दुर्गवीर प्रतिष्ठान, महाराष्ट्रच्यावतीने मानगड व सुरगड किल्ल्यावर विजयोदुर्गोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी गडावर गडपूजन, शिव पूजन, गडदेवतेचे पूजन, ध्वज पूजन व शस्त्रपूजन करण्यात आले. झेंडूच्या फुलांची तोरणे, पताका यांच्या सहाय्याने गडाचे प्रवेशद्वार व गुप्त दरवाजा वास्तुंची सजावट करण्यात आली. यावेळी गावकरी व चिमुकल्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.मानगडावर प्रवेशद्वार, बुरुज, इंजाई देवी मंदिर परिसर, शिवपिंडी, ध्वज स्तंभ, गुप्त दरवाजा इ. वास्तुंची साफसफाई करण्यात आली. त्यानंतर गडाला पताके, तोरणं, ध्वज व महिलांनी रांगोळ्यांची आरास करून गड सजवला. गडाच्या महाद्वारावर गडपूजन करून, शिवपिंडीचे पूजन, ध्वज पूजन, शस्त्रपूजन आणि महाराजांच्या मूर्तीचे पूजन करून आरती करण्यात आली.

यावेळी बालदुर्गवीर गार्गी डिंगणकर हिने ध्येय मंत्र घेऊन व शौर्य हासुरकर यांने शिव छत्रपतींचा जयजयकार करुन उपस्थित दुर्गवीरांच्या अंगात एक ऊर्जा निर्माण केली. कार्यक्रमास इतिहास संकलक रामजी कदम यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. सुरज जोरकर व साहील दबडे यांनी या कार्यक्रमाचे चित्रीकरण केले. मानगड किल्ल्यावर विजयोदुर्गोत्सव साजरा करण्यासाठी एकूण २५ दुर्गवीर सदस्यांनी सहभाग घेतला. मोहीमे प्रमुख प्रशांत डिंगणकर, अल्पेश पाटील,प्रमोद डोंगरे, प्रतिक पाटेकर, व सहभागी सदस्य प्राजक्ता पाटील, प्रांजल डिंगणकर, गीतांजली लोकेगावकर,कल्पना निवाते,आकाश कोराटे, उज्वला कोराटे, विशाल बामणे, भावेश कदम, जयेश भद्रिके, आकाश ठाकूर, प्रणिता उत्तेकर, संस्कृती हसुरकर, अनिकेत सावंत, मनीषा निगडे, वृषाली निवळे यांच्यासह बाल दुर्गवीर गार्गी डिंगणकर, अहिल्या हासुरकर, शौर्य हासुरकर, रूद्र कदम, लक्ष्मिका निवाते व गौरी खरात सहभागी होते.

लहान मुले, तरुण मंडळी आणि काही जेष्ठ नागरिक असे जवळपास ४०-५० जण सहभागी झाले होते. सर्वजण पारंपरिक वेशभूषेत होते. गडदेवतेचे म्हणजेच अनसाई देवीचे मंदिरात सर्वांनी मिळून पूजाविधी केली देवीची आरती करून सर्वांनी हर हर महादेवच्या घोषणा देत गडाचा माथा गाठला.

महादरवाजा मध्ये गड पूजनाचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. या मोहिमेत दुर्गवीर सदस्य महेश सावंत, विशाल इंगळे, किशोर सावरकर, जितेंद्र पार्टे, सुरेखा पार्टे,किशोरी सावरकर व शिवशंभू प्रतिष्ठानचे नरेंद्र महाडीक, मनिषा महाडिक, अस्मित महाडिक, श्रीकांत जंगम यांच्यासह ५० शिवप्रेमींचा सहभाग होता.

> दुर्गवीर प्रतिष्ठान ही संस्था गेली १४ वर्ष सातत्याने आपले सण उत्सव गडावर मोठ्या उत्साहात साजरे करत आहे. गडसंवर्धन हा विषय गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या गावागावात पोहोचावा, स्थानिक गावकरी वर्ग संवर्धनासाठी तयार व्हावे यासाठीचा हा प्रामाणिक प्रयत्न ही संस्था करत आली आहे. अश्या उपक्रमात सहभागी होऊन मी खारीचा वाटा घेत असतो.
>
> -विशाल सरदेशमुख
> दुर्गवीर सदस्य

जागतिक मानसिक आरोग्य दिनाबाबत जनजागृती

वर्षा मेहता

। अलिबाग ।

मानसिक आरोग्याच्या महत्त्वाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी जगभरात जागतिक मानसिक आरोग्य दिन पाळला जातो. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या मते, हा दिवस मानसिक आरोग्याच्या समस्यांवर काम करणार्यांना त्यांच्या कामाबद्दल बोलण्याची संधी देतो. या दिशेने केलेले प्रयत्न कसे महत्त्वाचे आहेत आणि आणखी किती कामांची गरज आहे यावर या दिवसाचे महत्त्व अधोरेखित होते.

SOCIAL MEDIA पडसाद

गेल्या काही वर्षांत, जागतिक आरोग्य संघटना आणि अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांनी जागतिक विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मानसिक आरोग्याचे महत्त्व मान्य केले आहे. डब्ल्यूएचओच्या मते, नैराश्य हे अपंगत्वाच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे आणि १५ आणि २९ वर्षे वयोगटातील मृत्यूचे चौथे प्रमुख कारण आत्महत्या आहे. जागतिक मानसिक आरोग्य दिन १० ऑक्टोबर १९९२ रोजी प्रथमच साजरा करण्यात आला. हा जागतिक फेडरेशन फॉर मेंटल हेल्थ, १५० हून अधिक सदस्य राष्ट्रांसह एक जागतिक संघटना आहे.

या वर्षाची थीम होती मानसिक आरोग्य आणि कल्याण सर्वांसाठी जागतिक प्राधान्य. दरवर्षी या दिवशी, मानसिक आरोग्याचे वकील जगभरातून एकत्र येतात आणि मानसिक आजार आणि लोकांच्या जीवनावर त्याचा मोठा परिणाम याकडे लक्ष वेधण्यासाठी वार्षिक जागरुकता कार्यक्रम साजरा करतात. जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त काही राष्ट्रे मानसिक आरोग्य सप्ताह पाळतात.

पार्वती नांदगावकर यांचे निधन

। रेवदंडा । वार्ताहर ।

पार्वती चांगू नांदगावकर यांचे वयाच्या ९७व्या वर्षी निधन रविवार (९) रोजी मांडला येथील राहत्या घरी झाले.त्यांच्या पश्चात एक मुलगी व चार मुलगे, २५ नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे कार्यविधीचे कार्यक्रम हरिहरेश्वर गोळा स्टॉप रेवदंडा, येथे मंगळवार १८ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता तर उत्तरकार्य शुक्रवार २१ मांडला, ता. मुरुड येथील राहत्या घरी सकाळी १०.०० वाजता करण्यात येणार आहेत.

कु. निर्विन सुमेध जाधव
यास पहिल्या
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
मम्मी-पप्पा, आजी-आजोबा, काका-काकू, नक्ष दादा

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)